cmyk

## संपादकीय

### कोकाटे यांची बिनडोक्याची कलकल !

एकीकडे भारत हा कृषिप्रधान देश आहे, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे असे म्हणायचे, त्याच्यावर शेतकरी राजा, बळिराजा अशी स्तुतिसुमने उधळायची, 'जय जवान, जय किसान' असा नारा द्यायचा आणि दुसरीकडे कर्जमाफीच्या पैशातून साखरपुडे, लग्न यावर पैसा उधळता असे बरळत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळायचे असे सरकारचे धोरण दिसते. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी तो पराक्रम करून दाखवला आहे. धरणात पाणीच नसेल तर मी काय करू असे म्हणणाऱ्या पक्षाध्यक्षांच्या पक्षाचे कोकाटे हे सदस्य आहेत. तेव्हा त्यांच्याकडून अपेक्षा ती काय करायची? ते असेच काही तरी बरळणार, वादग्रस्त विधाने करणार.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### जम्मू आणि काश्मीर विधानसभेत वक्फवरून प्रचंड गदारोळ

श्रीनगरः वक्फ दुरुस्ती कायद्यावरून सोमवारी (दि.७) जम्मू आणि काश्मीर विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला. नॅशनल कॉन्फरन्स वक्फ विधेयकावर चर्चा करण्याची मागणी करत आहे. एनसी नेते तन्वीर सादिक वक्फ कायद्याविरुद्ध स्थगन प्रस्ताव आणण्याची मागणी केली. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे आणि त्यामुळे त्यावर चर्चा करता येणार नाही, असे विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केले. भाजपने प्रथम प्रश्नोत्तर सत्राची मागणी केली होती, तेव्हा नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांनी ''वक्फ विधेयक स्वीकार्य नाही, ते परत घ्या'' इत्यादी घोषणा दिल्या. नॅशनल कॉन्फरन्सच्या आमदारांनी गोंधळ घातल्यानंतर विधानसभेचे कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३४३ | मंगळवार, दि.०८ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# यंदाही वरुणराजा शेतकऱ्यांना खूश करणार!

## आयएमडीचा मान्सूनबाबत पहिला अंदाज समोर

**मुंबई । प्रतिनिधी**

**भारतीय हवामान विभागाकडून या वर्षी मान्सूनवर पडणाऱ्या एल निनोच्या प्रभावाची शक्यता नाकारण्यात आली आहे. एल निनोमुळे मान्सूनच्या पावसावर मोठा प्रभाव पडतो. मान्सूच्या प्रमाणात घट होते. यंदा एल निनोचा प्रभाव नसल्याने वरुणराजा शेतकऱ्यांना खूश करणार आहे.**



एल निनोची निर्मिती ही प्रशांत महासागराचे तापमान वाढल्यामुळे होते. एल निनोचा परिणाम हा भारतात मान्सून दरम्यान पडणाऱ्या पावसावर होत असतो. एल निनोमुळे भारतातील पर्जन्यमानामध्ये सरासरीच्या तुलनेत घट होते. दरम्यान सोमवारी भारतीय हवामान विभागाकडून एक पत्रकार परिषद घेण्यात आली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना आयएमडीचे संचालक एम महापात्रा यांनी म्हटले आहे की, हवामान अंदाज तसेच आंतरराष्ट्रीय अंदाज या आधारावर आपण असे म्हणू शकतो की, यावर्षी मान्सूनवर एल निनोचा प्रभाव पडणार नाही. ◀◀ पान २ वर

### आधी उष्णतेची लाट नंतर सरासरी पाऊस

पुढे बोलताना महापात्रा यांनी असे देखील म्हटले आहे की, यावर्षी मान्सून सामान्य होण्याचा अंदाज आहे. मात्र त्यापूर्वी एप्रिल ते जून या कालावधीमध्ये देशभरात हिट वेव्हचा तडाखा बसू शकतो. तापमान सरासरी पेक्षा अधिक असणार आहे. देशातील काही भागांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या देखील वर जाऊ शकते. हे तापमान सरासरी तापमानाच्या तुलनेत ५ अंश सेल्सिअसने अधिक आहे. पूर्व उत्तर भारतामध्ये प्रचंड उष्णता पाहायला मिळू शकते असे त्यांनी यावेळी म्हटले, महाराष्ट्रात देखील पुढील दोन महिने प्रचंड उकाडा जाणवणार आहे. सरासरीपेक्षा अधिक तापमान राहण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात...

### ते अजित पवार पोलिसांच्या ताब्यात

सातारा–जयकुमार गोरे खंडणी प्रकरणात शरद पवार गटाचा अजित पवार नावाचा एक कार्यकर्ता पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. काही दिवसांपूर्वी काही दिवसांपूर्वी मंत्री जयकुमार गोरे यांनी दहिवडी पोलीस ठाण्यात पाच कोटी खंडणी मागितल्याची तक्रार केली होती.

### गोदावरीसह इतर नद्यांसाठी मनसे आक्रमक

मुंबई–नद्यांचे पावित्र्य जपले जावे, प्रदूषण मुक्त नद्या व्हाव्या यासाठी मनसे आंदोलन करणार आहे. प्रचंड पैसा खर्च करूनही नद्या प्रदूषित असल्याने मनसेने प्रशासनाला ईशारा दिला आहे. नाशिकच्या राजगड येथील मध्यवर्ती कार्यालयात पत्रकार परिषद घेत मनसेने भूमिका मांडली आहे.

### पूजेचे पैसे व्याजासह कोर्टात जमा करण्याचे आदेश

नाशिक–काळाराम मंदिराच्या अध्यक्षांना उच्च न्यायालयाने हटकले आहे. जिल्हा अतिरिक्त न्यायाधीश हे काळाराम मंदिर संस्थानचे अध्यक्ष होते. दैनंदिन पूजा आणि प्रसादासाठी येणाऱ्या खर्चाला अध्यक्षांनी नकार दिला होता. आता पूजेचे पैसे व्याजासह कोर्टात जमा करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

### भाजप नेते किरीट सोमय्या यांना धमक्या

मुंबई–भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मुंबईतील मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांचा आणि अनधिकृत मशिदींचा प्रश्न लावून धरला आहे. शिवाजी नगर गोवंडीमधील ७२ मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांबाबत त्यांनी तक्रार केली आहे. यावरुन त्यांना आता सोशल मीडियावर धमकावले जात आहे.

## अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरण; मुंबई हायकोर्टाचा आदेश

# पोलिसांवर गुन्हा दाखल करा!

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई उच्च न्यायालयाने अक्षय शिंदे चकमक प्रकरणी पोलिसांना दणका दिला आहे. अक्षय शिंदे प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पाच पोलिसांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. कोर्टाने संबंधित पोलिसांना निलंबित करण्याचाही आदेश दिला आहे. तसेच एक विशेष पथक गठीत करुन प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई गुन्हे शाखेचे सह पोलीस आयुक्त लखमी गौतम यांच्या देखरेखीखाली ही समिती स्थापन करण्यास सांगण्यात आले आहे.**



मुंबई उच्च न्यायालयाने समितीला सगळ्या बाजूंनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य सरकारने आदेशावर स्थगिती आणण्याची मागणी केली. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारची मागणी फेटाळली. निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी राज्य सरकारने आदेशावर स्थगिती देण्याची मागणी केली होती. कोर्टाच्या आदेशानंतर वकील असीम सरोदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ◀◀ पान २ वर

## घरगुती गॅस सिलिंडर दरात ५० रूपयांनी वाढ



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशात घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत वितरण कंपन्यांनी ५० रूपयांनी वाढ केली आहे. जनरल ग्राहक तसेच प्रधानमंत्री उज्वला योजनेतील लाभार्थ्यांनाही ही दरवाढ लागू असेल. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी ही माहिती दिली. दरम्यान, दरवाढीने सर्वसामान्यांच्या खिशाला ◀◀ पान २ वर

# भाजपाला मिळाल्या सर्वाधिक देणग्या!

## ताज्या अहवालातून आकडेवारी आली बाहेर;काँग्रेस दुसऱ्या स्थानी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

एडीआर अहवालातील माहितीनुसार, भारतीय जनता पक्ष (भाजप) आर्थिक वर्षात निवडणूक देणग्यांमध्ये सर्वाधिक देणगी मिळवणारा पक्ष ठरला आहे. भाजपला ८,३५८ देणग्यांमधून २२४३.९४७ कोटी रुपये देणगी मिळाली आहे. २८१.४८ कोटी रुपये देणगी रुपात मिळवत काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२३–२४ या आर्थिक वर्षात भाजपने घोषित केलेल्या देणग्या काँग्रेस, आप, एनपीईपी आणि सीपीआय(एम) यांनी घोषित केलेल्या ◀◀ पान २ वर

### राजकीय पक्षांना देणगी देणारे टॉप १० देणगीदार

१) प्रुडंट इलेक्टोरल ट्रस्ट – भाजप आणि काँग्रेसला एकत्रितपणे ८८० कोटी रुपयांची देणगी दिली. २) ट्रायम्फ इलेक्टोरल ट्रस्टकडून भाजपला १२७.५० कोटी रुपयांची देणगी. ३) डेरिव्ह इन्व्हेस्टमेंट्सने भाजपला ५० कोटी तर काँग्रेसला ३.२ कोटी रुपयांची देणगी. ४) ॲक्मी सोलर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड : (५१ कोटी). ५) रुंगटा सन्स प्रायव्हेट लिमिटेड : (५० कोटी). ६) भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड : ( ५० कोटी). ७) आयटीसी इन्फोटेक इंडिया लिमिटेड : ( ८० कोटी). ८) दिनेश चंद्र आर. अग्रवाल इन्फ्रॅकॉन प्रायव्हेट लिमिटेडकडून भाजपला ३० कोटी. ९) दिलीप बिल्डकॉन लिमिटेड : ( २९ कोटी). १०) मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड : (२७ कोटी).

## सुर्याची आग वाढली, अकोला ४४ पार



**अकोला । प्रतिनिधी**

**एप्रिल महिना पुढे सरकतो तसा सूर्याचा प्रकोपही वाढायला लागला असून विदर्भावर हा कोप अधिकच दिसून आला आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत आहेत. सोमवार दि. ७ एप्रिल रोजी अकोल्याचे कमाल तापमान ४४.२ अंशावर पोहचले, जे राज्यात सर्वाधिक होते.**

विदर्भातील इतर सर्व जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली असून ८ व ९ एप्रिल या पुढच्या दोन दिवसांत उष्ण लाटांचा सामना करावा लागेल, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. अकोल्यात सोमवारी एका अंशाची वाढ होत तापमान ४४.२ अंशावर पोहचले, जे सरासरीपेक्षा ४ अंशाने अधिक आहे. त्या खालोखाल चंद्रपूर व अमरावतीत ४३.६ अंशाची नोंद झाली. ब्रम्हपुरीचा पारा ४३.८ अंशावर गेला. दुसरीकडे नागपुरात अंशत: वाढ होत पारा ४२.४ अंशावर पोहचला. वर्धा, यवतमाळातही तापमान ४२ अंशावर होते. गडचिरोली ४१ व गोंदिया ४० अंश नोंदविण्यात आले. सर्वच जिल्ह्यात तापमान सरासरीपेक्षा २ ते ४ अंशाने अधिक चढले आहे. रात्रीच्या तापमानातही किंचित वाढ नोंदविण्यात आली आहे. हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार बदलत्या वातावरणीय स्थितीमुळे मध्य भारत, उत्तर–पश्चिम राज्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पुढचे तीन दिवस कमाल ◀◀ पान २ वर

## आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रूड ऑईल ६५ डॉलरवर पण भारतात जनतेची लूट

### हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

जागतिक बाजारात क्रूड ऑईलचे दर सातत्याने कमी होत असताना त्याचा फायदा देशातील जनतेला होत नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईल ६५ डॉलर प्रति बॅरल असताना देशात पेट्रोलचे दर १०९ रुपयाच्या आसपास तर डिझेलचे ९३ रुपयांच्यावर आहे. भाजपा सरकार इंधनावर अन्यायकारक झिजीया कर आकारून जनतेची लूट करत आहे. क्रूड ऑईलचे कमी झालेले दर व कररुपी लूट कमी केली तर पेट्रोल ५१ रुपये आणि डिझेल ४१ रुपये प्रति लिटर करणे शक्य आहे ते सरकारने करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.




टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत ◀◀ पान २ वर

## शक्तिपीठ महामार्गावरून शेतकरी अधिक आक्रमक होणार

### शेतकऱ्यांचा विरोध असतानाही केंद्राकडून पर्यावरणीय पाहणीला मंजुरी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**राज्यभरातून शक्तिपीठ महामार्गाला विरोध होत आहे. मात्र, सरकार शेतकऱ्यांची दखल न घेत हा महामार्ग रेटण्याच्या हालचाली सुरू करत आहे. मागच्या काही महिन्यांपूर्वी नांदेड जिल्ह्यात भूसंपादनाच्या नोटिस काढल्या होत्या. यानंतर सरकारने पुढचे पाऊल उचलत धाराशिव ते कोल्हापूर या ३२४ किमीचा टप्प्याच्या पर्यावरणीय पाहणीला केंद्र शासनाने परवानगी दिली आहे.**



**यावरून राज्यभरात तीव्र आंदोलन उभारण्यासाठी शेतकऱ्यांची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली आहे.**

माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारच्या भूमिकेवर तीव्र शब्दात विरोध केला. शेट्टी म्हणाले की, ''राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या अनुदानाचे पैसे थकलेले आहेत. मात्र, कोट्यावधी रूपयांच्या पैशाचा चुराडा करण्यासाठी राज्य सरकार शक्तिपीठ महामार्ग रेटण्याच्या प्रयत्नात आहे. शक्तिपीठ महामार्ग करणार नाही असे सांगून निवडून आलेल्या महायुती सरकारने केंद्रीय पर्यावरण विभागाकडून पर्यावरणीय पाहणीला मंजुरी घेतली. यावरून सरकारचा दुटप्पीपणा ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८०.०० क्विंटल | २,३१३ | २,७५० | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड: १९२.०० क्विंटल | १,८०० | ३,२४२ | २,५८८ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ३५.५० क्विंटल | ६,८५० | ७,१७६ | ७,०७१ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६४.०० क्विंटल | २,४०० | २,६१५ | २,५०१ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:४२.५० क्विंटल | ४,२०० | ४,३२५ | ४,२६२ |
| हरभरा: २१.५० क्विंटल | ५,४०० | ५,५०० | ५,४६६ |

# ट्रम्प यांच्या टॅरिफचा बॉम्ब जगाच्या मुळावर?

## गोल्डमन सॅक्सचा धक्कादायक अहवाल, अमेरिकेची सुध्दा चिंता वाढली

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या आयात शुल्कामुळे जगभर गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. भारतातही त्याचे पडसाद उमटण्यास सुरुवात झाली आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयाचा परिणाम अमेरिकेसह जगाला भोगावा लागणार असून जगाची वाटचाल मंदीकडे होण्याची शक्यताही अनेकांनी वर्तवली आहे. त्यातच आता गोल्डमन सॅक्सच्या अहवालामुळे अमेरिकेसह जगाच्या चिंतेत भर टाकली आहे.**






जागतिक गुंतवणूक बँक गोल्डमन सॅक्सने अमेरिकेत मंदीची शक्यता ३५ टक्क्यांवरून ४५ टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. एकाच आठवड्यात सलग दुसऱ्यांदा त्यांनी अमेरिकेच्या मंदीबाबत हा अंदाज व्यक्त केला. यामागे अमेरिका आणि इतर देशांमधले वाढते व्यापार युद्ध आणि ट्रम्प सरकारने लादलेले प्रचंड आयात शुल्क कारणीभूत आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी टॅरिफ पॉलिसी जाहीर केली आणि इतर देशांवर मोठं आयात शुल्क लागू केले आहे. त्यामुळे केवळ अमेरिकेतच नव्हे तर जागतिक बाजारपेठेतही खळबळ उडाली आहे. शेअर बाजारात मोठी घसरण झाली आणि त्यानंतर एकापाठोपाठ एक गुंतवणूक बँकांनी मंदीची भीती व्यक्त ◀◀ पान २ वर

### व्यापार युद्धामुळे महागाई वाढणार

अमेरिकन सेंट्रल बँक फेडरल रिझर्व्ह (फेड) आता काय निर्णय घेणार यावर देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती अवलंबून आहे. गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार, जूनपासून फेड त्याच्या व्याजदरात कपात करण्यास सुरुवात करेल आणि २५ बेस पॉइंट्सचे सलग तीन कपात होऊ शकतात. जेपी मॉर्गन आणि वेल्स फार्गो यांच्या मते, २०२५ मध्ये व्याजदर तीन ते पाच वेळा कमी केले जाऊ शकतात जेणेकरून बाजाराला आधार मिळू शकेल.

### भारतात काय होईल?

एक प्रकारे व्यापारयुद्धाची धग आता अमेरिकन अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचली आहे. अशीच स्थिती राहिल्यास संपूर्ण जगासाठी आर्थिक अडचणी वाढू शकतात. भारतासारख्या देशांना या परिस्थितीत स्मार्ट रणनीती बनवावी लागेल. त्यामुळे जागतिक मंदीचा प्रभाव कमी करता येईल आणि नवीन संधी शोधता येतील.

cmyk

## अग्रलेख

# कोकाटे यांची बिनडोक्याची कलकल !

एकीकडे भारत हा कृषिप्रधान देश आहे, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे असे म्हणायचे, त्याच्यावर शेतकरी राजा, बळिराजा अशी स्तुतिसुमने उधळायची, 'जय जवान, जय किसान' असा नारा द्यायचा आणि दुसरीकडे कर्जमाफीच्या पैशातून साखरपुडे, लग्न यावर पैसा उधळता असे बरळत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळायचे असे सरकारचे धोरण दिसते. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी तो पराक्रम करून दाखवला आहे. धरणात पाणीच नसेल तर मी काय करू असे म्हणणाऱ्या पक्षाध्यक्षांच्या पक्षाचे कोकाटे हे सदस्य आहेत. तेव्हा त्यांच्याकडून अपेक्षा ती काय करायची? ते असेच काही तरी बरळणार, वादग्रस्त विधाने करणार. याच महाशयांनी मागे एकदा बळिराजाला भिकारी म्हटले होते. जगाचा पोशिंदा भिकारी असतो काय? शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी करणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आता माफी मागितली असली तर त्यांच्या मनातील मळभ समोर आलेला आहे. त्यांची सुरू असलेली ही कलकल केवळ बिनकामाची आहे.

शेतकरी कर्ज घेतात आणि पाच-दहा वर्षे कर्जमाफीची प्रतीक्षा करतात. नियमित कर्जफेड करणाऱ्यांनी काय करायचे, तुम्ही कर्जमाफीच्या पैशाचे काय करता, साखरपुडे, विवाह करीत फिरता असे धक्कादायक विधान कोकाटे यांनी केले. कोकाटे यांच्या या विधानावर शिवसेना (उबाठा), काँग्रेस आणि अन्य पक्षांच्या नेत्यांनी सडकून टीका केली आहे. बळिराजा हा जगाचा पोशिंदा आहे, पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी भाजप-युती सरकार सोडत नाही. कोकाटेंना सत्तेची एवढी झिंग चढली आहे की, ते सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते, ते अद्याप पाळलेले नाही. कर्जमाफीसाठी पैसे नाहीत असे सरकार म्हणते. त्यात कर्जमाफीवरून कृषिमंत्र्यांचा शेतकऱ्यांना प्रश्न म्हणजे 'चोर तो चोर आणि वरून शिरजोर' असा प्रकार आहे. फडणवीस सरकारमध्ये एक एक मंत्री म्हणजे नमुना आहे. कोकाटे हे त्यापैकीच एक. या मंत्र्यांना आवर घालायला हवा. शेतमालाला भाव नाही, हमीभावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. शेतकरी संकटात असून दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्याची कृषिमंत्री वा युती सरकारला लाज वाटत नाही, उलट शेतकऱ्यांनाच अजब प्रश्न विचारले जात आहेत. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडातला घास पळवला आहे. अशा परिस्थितीत कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणे अत्यंत दुर्दैवी म्हटले पाहिजे. शेतकऱ्यांना भिकारी म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. लोकप्रतिनिधींना सर्व सुखसोयी दिलेल्या असतानाही त्यांनी आपल्या मानधनात नुकतीच भरघोस वाढ करून घेतली आहे, इथे खरा भिकारी कोण असा प्रश्न उपस्थित होतो. जगाच्या पोशिंद्याला तुम्ही भिकारी असे संबोधता, तुम्ही काय कमी आहात काय? वारेमाप आश्वासने देऊन सत्तेवर यायचे हा अलिकडे ट्रेंडच बनला आहे. आश्वासने पाळता येत नसतील तर ती द्यायची कशाला असा सर्वसामान्यांना प्रश्न पडतो. मात्र निगरगट्ट राजकारण्यांना त्याचे कसलेही सोयरसुतक नसते.

## धार्मिक स्थळात स्फोट; आरोपींवर 'यूएपीए' कलम वाढविले

**बीड। प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील अर्धामसला येथे रमजान ईदच्या आदल्या दिवशीच २ समाजकंटकांनी धार्मिक स्थळाच्या ठिकाणी जिलेटीन कांड्या लावून स्फोट घडवून आणला होता. या प्रकरणात दोन्ही आरोपी अटकेत होते. त्यांना पोलिस कोठडीसाठी शनिवारी बीडच्या न्यायालयात हजर केले. यावेळी त्यांच्याविरोधात 'यूएपीए' म्हणजेच दहशतवादी कृत्य केल्याचे कलम वाढविले आहेत.**

अर्धामसला येथे जुन्या वादातून वाद झाले. यावेळी गावातीलच विजय गव्हाणे व श्रीराम सागडे यांनी जिलेटीन लावून धार्मिक स्थळात स्फोट घडवून आणला. यामुळे तणाव निर्माण झाला होता. परंतु पोलिसांनी दोन्ही आरोपींना तातडीने अटक केल्याने आणि हिंदू-मुस्लीम समाजात शांततेची बैठक घेतल्याने हे वातावरण शांत झाले होते. यातील आरोपींना २ वेळा पोलिस कोठडी मिळाल्यानंतर शनिवारी पुन्हा त्यांना न्यायालयात हजर केले. यावेळी यूएपीए कायद्यातील कलम १५, १६, १८ व भारतीय न्याय संहितातेतील कलम ११३ हे कलम वाढविले आहेत. पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांनी ही माहिती दिली. तसेच दोन्ही आरोपींना ९ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. यूएपीए कायद्यातील कलम १६ म्हणजे दहशतवादी कृत्य आणि १८ म्हणजे कट रचणे. हा गुन्हा गंभीर असतो. यातील आरोपीला कमीत कमी ५ वर्षे आणि जास्तीत जास्त जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. यूएपीए कायद्याला मराठीत बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंधक) कायदा असे यास म्हटले जाते. दहशतवादी कारवाया करणे किंवा त्या कृतीत सामील होणे, असाच अर्थ यूएपीएचा होतो. दहशतवादी कारवायांना प्रोत्साहन-समर्थन देणे, दहशतवाद घडवण्यासाठी आर्थिक मदत करणे, प्लॅनिंग करणे, अशी व्याख्या या कायद्याची आहे.

## जलसम्राट यांच्या वाढदिवसा निमित्त बुधवारी कुस्त्यांची दंगल

### खा.कल्याण काळे यांच्या हस्ते उद्घाटन

**जालना। प्रतिनिधी**

**जालन्याचा आज पर्यंत कोणीही पाण्याचा प्रश्न सोडला नाही अशी ओळख असणारे जलसम्राट माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या वाढदिवसा निमित्त जालना शहरात दि.९ एप्रिल बुधवार रोजी दुपारी १ वाजता केसरी कुस्त्यांची भव्य दंगल आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत राज्यातील नामांकित मल्ल सहभागी होणार असून लाखो रुपयांची बक्षिसांची लयलूट केली जाणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.**



शहरातील आझाद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन खा.डॉ.कल्याण काळे यांच्या हस्ते करण्यात येणार असून अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मंत्री राजेश टोपे हे राहणार आहेत.तर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ,जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जालना मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राकॉचे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख, प्रदेश सदस्य एकबाल पाशा, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख,बंकटलाल यादव, पै. भरत मेकाले, हंसराज डोंगरे, कुस्तीगीर परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्राचार्य दयानंद भक्त, युवा नेते अक्षय गोरंटयाल,जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे,काँग्रेस अल्पसंख्याक आघाडीचे बदर चाऊस, शिवसेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, भाजयुमोचे शहराध्यक्ष सुनील खरे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजय चौधरी, माजी सभापती महावीर ढक्का,व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सतीश पंच, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी,दीपक भुरेवाल, घनशाम खाकीवाले,बाबुराव मामा सतकर, राकॉचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, कुस्ती संघाचे जिल्हाध्यक्ष रवि राऊत,शिवाजी शेजुळ,कुंदन काठोठीवाले, काँग्रेसच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा नंदाताई पवार आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.जालना शहर व जिल्ह्यातील कुस्तीप्रेमी जनतेने मोठया संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहन काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा,कैलास गोरंटयाल मित्रमंडळ आणि आयोजन समितीने केले आहे.

> **नामवंत मल्लांचा करणार सत्कार**
>
> या प्रसंगी कुस्ती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल करणाऱ्या नामवंत मल्लांचा आयोजकांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने या वर्षाचे महाराष्ट्र केसरी वेताळ शेळके,डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे,पंजाब केसरी शेंडीकुमार, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील,हर्षवर्धन सदगीर,प्रशांत जगताप, सतपाल सोनटक्के यांचा समावेश आहे.

## ब्रम्हगावात आंतरजातीय विवाहांचा सपाटा..

**आष्टी । पतिनिधी**

**तालुक्यातील ब्रह्मगाव या गावामध्ये अनेक तरुणांनी आंतरजातीय विवाहाचा पर्याय निवडला अनेक युवकांनी जाती पातींच्या भिंती तोडून आंतरजातीय विवाह करण्याचा सपाटा लावला आहे.**

सध्याच्या युगामध्ये तरुणांची बेरोजगारी तसेच मुलीच्या आई वडिलांच्या वर पक्षाकडून वाढत्या वाढत्या अपेक्षा मुळे मुलांना आपल्या जातीमध्ये मुली मिळत नसल्यामुळे कठीण परिस्थिती निर्माण झाल्याने आता यावर पर्याय म्हणून आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव गावातील अनेक तरुणांनी आंतरजातीय विवाह करून तरुण पिढी पुढे आदर्श ठेवला आहे याची चर्चा आष्टी तालुक्यामध्ये सर्वत्र होत आहे आष्टी शहरापासून अवघ्या सहा किलोमीटरवर असणाऱ्या ब्रह्मगाव गावामध्ये आत्तापर्यंत मागील वर्षात जवळपास १२ तरुणांनी विविध जातीच्या मुलीं बरोबर आपला संसार थाटला आहे यामध्ये काही तरुणांना घरातून थोडाफार विरोध झाला मात्र तो विरोध काही दिवसांनी शमला व घरच्यांनी देखील आई-वडिलांनी या आंतरजातीय विवाहाला पाठिंबा देत त्या मुलींचा सून म्हणून स्वीकार केला आहे यामुळे येणाऱ्या काळामध्ये तरुणांनी आंतरजातीय विवाह योग नक्की करावा मात्र तो आई-वडिलांना विश्वासात घेऊन करावा असेही गावातील ज्येष्ठ लोक बोलू लागले आहेत.

## जवळा येथे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त रंगला जंगी कुस्त्यांचा फड



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**पंचक्रोशीतील फकीर जवळा येथे यावर्षी प्रथमच राम जन्मोत्सवानिमित्त जंगी कुस्त्यांच्या दंगली चे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने काल (दि०६) रविवारी करण्यात आले होते. फडातील अंतिम सामना जय हनुमान तालीमच्या अनिकेत गोरे याने जिंकला. त्याला मानाची गदा व रोख पाचहजार रुपये देऊन गावकऱ्यांच्या वतीने सन्मानित करण्यात आले. रणरणत्या उन्हातही कुस्ती शौकीन मंडळी हजारोंच्या संख्येने उपस्थित होती. ग्रामस्थांच्या वतीने सावली, पाणी, पोलिस बंदोबस्त आदी बाबतीत चोख नियोजन करण्यात आले होते.**

कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन फकीर जवळा (ता.धारुर) गावचे सरपंच त्रिंबक साबळे, जय हनुमान कुस्ती तालीमचे वस्ताद ज्ञानोबा गोरे, रावसाहेब आब्दागिरे, काशिनाथ साबळे, विष्णू खांडेकर, शिवाजी साबळे, केशव साबळे आदी प्रमुख गावकऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, प्रदीप ठोंबरे, हनुमंत भोसले, विठ्ठल माने आदींची उपस्थिती होती. रविवारी दुपारी रंगलेल्या कुस्तीच्या आखाड्यात अनेक नामवंत पैलवानांनी आकर्षक कुस्त्या केल्या. समस्त गावकऱ्यांच्या देखरेखीखाली कुस्तीची दंगल सुरळीत पार पडली. फडात रावसाहेब तिडके, हनुमान मुंडे, शिवाजी साबळे, अशोक खांडेकर, प्रशांत चोपडे आदींनी पंच म्हणून भूमिका निभावली. यावेळी बारा वर्षीय वयोगटापासून ते तीस वर्षांपर्यंत च्या मल्लांमध्ये कुस्त्यांची दंगल रंगली. शंभर रुपयांपासून ते पाच हजार रुपयांची बक्षिसे जिंकलेल्या मल्लांना देण्यात आली. शेवटची पाच हजार रुपयांची कुस्ती सायंकाळी साडेसहा वाजता संपली. ही कुस्ती जवळा येथील जय हनुमान तालीमच्या अनिकेत गोरे व परभणी येथील पांडुरंग श्रावले यांच्यात खेळवण्यात आली. अनिकेत गोरे याने श्रावलेची पाठ लोळवत कुस्ती मारली. दोन नंबरच्या दोन कुस्त्या लखन बडे (श्रीक्षेत्र देवदहिफळ, धारूर) व धनराज केंद्रे आणि लक्ष्मण करे व हनुमान गिरी यांच्यात झाल्या. यासोबतच सुनील बडे, किरण नवराळे, समीर शेख, समाधान गाडे (गंगाखेड), वैभव खटींग (परभणी), बाळू सलगर (वाघाळा, परळी), बाळू चामनर (येल्डा, अंबाजोगाई), सूरज शेख, राहुल लगड (तेलगाव), बबलू नाराळे, आमिर शेख, अक्षय खांडेकर, बंटी लटपटे आदि नामवंत मल्लांनी जवळा गावच्या काळ्या मातीत रोमहर्षक कुस्त्या खेळल्या. महादेव मुजमूले व सुखदेव देवकते यांनी या जंगी कुस्त्यांचे पहाडी आवाजात समालोचन केले.

> **प्रेक्षकांनी मैदान डोक्यावर घेतले**
>
> फडातील शेवटची व मानाची कुस्ती अनिकेत गोरे व पांडुरंग श्रावले यांच्यात झाली. दोघेही अतिशय कसलेले व तरबेज पहेलवान असल्याने ही लढत प्रेक्षनिय झाली. अतिशय रोमहर्षक व झटापटीची झालेली ही कुस्ती प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारी ठरली. सुरुवातीला पांडुरंग ने अनिकेतवर निकाल डाव टाकला. त्यावर अनिकेतने लपेट मारली व लागलीच आडवा हात डाव घालून कुस्ती चीतपट केली. अनिकेत गोरे याने पांडुरंगला चीतपट करत आस्मान दाखवल्यानंतर प्रेक्षकांनी जल्लोष करत मैदान डोक्यावर घेतले, त्याच्यावर रोख बक्षिसांचा अक्षरशः वर्षाव झाला.

## पवारवाडी येथे श्रीराम जन्मोत्सव साजरा; हजारो भाविकांनी घेतले दर्शन



**माजलगांव । प्रतिनिधी**

**माजलगांव तालुक्यातील पवारवाडी येथे श्रीरामनवमी जन्मोत्सव उत्साहात पार पडला. दि. ६ रोजी पहाटे पाच वाजल्यापासून श्रीराम मंदिरात श्रीरामपंचायतन महापूजेला सुरुवात झाली.**

दि.६ रोजी ठीक दुपारी बारा वाजता जन्मोत्सवपर किर्तन संपवून पाळणा गीत गाऊन, पुष्पांचा वर्षाव करून शंख नाद करून श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आकाशात तोफांची आतशबाजी करण्यात आली. आलेल्या हजारो भाविकांनी एकमेकांना पेड्याचा प्रसाद वाटप केला. जन्मोत्सवानंतर श्रीरामांच्या दर्शनासाठी भावीकांनी गर्दी केली होती. यावेळी ज्ञानेशवर शिंदे बाळु धुमाळ, गोविंद धुमाळ, राहुल धुमाळ ,पांडुरंग धुमाळ ,विष्णु धुमाळ ,माणिक शिंदे, गणेश शिंदे ,उमेश धूमाळ ,भागवत जाधव, माऊली जाधव ,भागवत शेळके, रावण शिंदे, नवनाथ शेळके, सर्जेराव ढिसले ,यशवंत जाधव ,वैजनाथ शिंदे ,बालासाहेब जाधव, रूसतुम धुमाळ, माणिक धुमाळ, योगेश धुमाळ, पांडुरंग पवार, बालासाहेब धुमाळ, एकनाथ धुमाळ, पभाकर शेळके ,किसन धुमाळ, आनिल धुमाळ ,छाया ताई जाधव ,मंगल धुमाळ ,जोतिताई धुमाळ ,सोनाली धुमाळ ,भाग्यश्री शिंदे'' शितल शिंदे ,मंडोधरी शिंदे ,चंदाकला मोरे , आश्विनी पवार ,गिता पवार ,वर्षा पवार, सागर धुमाळ, रूतुजा धूमाळ ,राणी धुमाळ , दुर्गा जाधव, उर्मिला धुमाळ ,आश्रुबाई धुमाळ ,मंडोधरी धुमाळ , उषा बोईनवाड ,आनिता नरवडे, रूक्मीण धुमाळ, आश्विनी शेळके ,मुक्ता जाधव ,छाया पवार, संगिता सुरवसे ,सुरेखा धुमाळ, रमाताई जाधव ,रूतुजा धूमाळ, अंजाना धुमाळ ,आशामती जाधव, राधाबाई धुमाळ ,मोहनी सुरवसे ,शरध्या मोरे यांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## पान १ वरून...

### यंदाही वरुणराजा

यावर्षी आपल्याला न्यूट्रल परिस्थिती पहायला मिळू शकते. त्यामुळे देशात यंदा सरासरी इतका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान २०२३ मध्ये एल निनोचा मोठा प्रभाव हा मान्सूनवर पडल्याचे पाहायला मिळालं होतं. एल निनोमुळे मान्सूनच्या प्रमाणात सरासरी ८ टक्के घट झाली होती. तर गेल्या वर्षी ना निनाच्या प्रभावामुळे ८ टक्के अतिरिक्त मान्सूनचा पाऊस पडला. ज्याचा मोठा फटका हा शेतकऱ्यांना बसल्याचे पाहायला मिळाले. २०२३ मध्ये एल निनोमुळे कोरडा दुष्काळ होता तर २०२४ मध्ये ना निनामुळे ओला दुष्काळ होता. मात्र यंदा सरासरी इतकाच पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

------------

### घरगुती गॅस सिलिंडर

कात्री लागणार असल्याने किचनचे बजेट बिघडणार आहे. १४.२ किलोग्रॅमचे गॅस सिलिंडरची किंमत आता ८५३ रूपये आणि उज्वला गॅस योजनेतील सिलिंडरची किंमत आता ५५३ रूपये इतकी असणार आहे. जनरल ग्राहकांसाठी दरवाढीपुर्वी १४.२ किलोग्रॅमच्या सिलिंडरची किंमत ८०३ रूपये होती. ती आता ८५३ रूपये झाली आहे. तर उज्वला योजनेतील ग्राहकांसाठी गॅसची किंमत ५०३ रूपये होती ती ५५३ रूपये इतकी झाली आहे.

------------

### पोलिसांवर गुन्हा

म्हटले की, अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात पोलीस केवळ सॉफ्ट टार्गेट आहेत. पोलिसांवर कुणी दबाव आणला ? आणि त्याचा एन्काउंटर कोणी करायला लावला याची माहिती घ्यावी लागेल. याचा थेट संबंध बदलापूरच्या भिंतीवर 'अब बदला पुरा हुआ' असे लिहिले तिथे लागत आहे. ज्या नेत्यांनी बेकायदेशीरपणे वर्तन केले आहे त्या सगळ्या नेत्यांना कायद्याच्या कचाट्यात घेण्याची गरज आहे. ज्यांनी अक्षय शिंदेच्या एन्काउंटरचे समर्थन केले आहे ते अत्यंत जुनाट विचाराचे आणि बेकायदेशीर डोक्याचे लोक आहेत, हुकूमशाही पद्धतीचे नेते आहेत. पुढे ते म्हणाले, ज्यांनी अक्षय शिंदेंच्या हत्येचे मर्थन केले ते बेकायदेशीर लोक आहेत. सत्ता आपल्या हातात असल्याने सत्ताधीश बनू पाहणारे हुकूमशाही प्रवृत्तीचे जे नेते आहेत त्यांनी अक्षय शिंदेंच्या मृत्यूचे राजकारण, भांडवल आणि समर्थन केले. ज्यांनी महत्त्वाच्या पदावर असताना असे म्हटलं की, पोलिसांना काय आम्ही बंदुका खेळण्यासाठी दिल्या आहेत का? त्यांच्यावरही गुन्हा दाखल झाला पाहिजे.

------------

### सुर्याची आग वाढली,

तापमानात २ ते ४ अंशाची वाढ होण्याची शक्यता आहे. त्यातही ८ व ९ एप्रिल रोजी विदर्भात तापमान वाढून उष्ण लाटांच्या स्थितीचा सामना करावा लागेल. सध्या गुजरातचे सौराष्ट्र, कच्छ, पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश, दिल्ली व मध्य प्रदेशातही उष्ण लाटांची स्थिती निर्माण झाली आहे. त्यानंतर वातावरणात पुन्हा बदल होत ढगाळ वातावरण व पुन्हा अवकाळी पावसाची स्थिती निर्माण होईल असा अंदाज आहे.

**शालेय परीक्षांबाबत निर्णय घ्या - नागपूर खंडपीठ**

वाढत्या तापमानामुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता लक्षात घेता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेशी संलग्रित सर्व माध्यम व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता नववी अशा क्रमाने परीक्षा घेण्याच्या मागणीवर तातडीने निर्णय घ्या, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने सोमवारी परिषदेच्या संचालकांना दिला. प्रकरणावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. लहान मुलांच्या परीक्षा विलंबाने होणार आहेत. परिणामी, पालक राजेश सुलभेवार व इतरांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तापमान सतत वाढत असल्यामुळे लहान मुलांच्या परीक्षा आधी घेणे आवश्यक आहे, असे त्यांचे म्हणणे होते. उच्च न्यायालयाने विविध बाबी लक्षात घेता हा आदेश देऊन याचिका निकाली काढली.

--------------

### भाजपाला मिळाल्या

एकूण देणग्यांच्या सहापट अधिक होत्या. निवडणूक आयोगाने विविध राजकीय पक्षांना मिळालेल्या देणग्यांची घोषणा या पूर्वीच केली आहे. आता २०२३-२४ या आर्थिक वर्षात राजकीय पक्षांना २०,००० रुपयांपेक्षा जास्त मिळालेल्या देणग्यांच्या निवडणूक आयोगाच्या आकडेवारीचे विश्लेषण करणारा अहवाल असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने (एडीआर) सोमवारी (दि. ७) जारी केला आहे. राष्ट्रीय पक्षांमध्ये भाजप, काँग्रेस, बहुजन समाज पक्ष (बसपा), आम आदमी पक्ष (आप), कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) (माकपा) आणि नॅशनल पीपल्स पार्टी (एनपीईपी) यांचा समावेश आहे. एडीआर अहवालात असे म्हटले आहे की, राष्ट्रीय पक्षांना सर्वाधिक (३,७५५ देणग्या) कॉर्पोरेट क्षेत्रांनी दिल्या आहे. ही रक्कम २२६२.५ कोटी रुपये (एकूण देणग्यांच्या ८८.९%) रुपये इतकी आहे. एकूण कॉर्पोरेट देणग्यांपैकी भाजपला सर्वाधिक देणग्या मिळाल्या आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात कॉर्पोरेट क्षेत्रांकडून भाजपला ३,४७८ देणग्या २०६४.५८ कोटी रुपये, तर ४,६२८ वैयक्तिक देणगीदारांनी पक्षाला १६९.१२६ कोटी देणगी मिळाली आहे. दरम्यान, काँग्रेसला एकूण आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये कॉर्पोरेट क्षेत्रांकडून १९०.३ कोटी रुपये आणि १,८८२ वैयक्तिक देणगीदारांकडून ९०.८९९ कोटी रुपयांच्या देणगीरुपी मिळाले. भाजपला ''२०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी इतर सर्व राष्ट्रीय पक्षांनी जाहीर केलेल्या एकूण कॉर्पोरेट देणग्यांच्या नऊ पट जास्त मिळाल्या आहेत.

------------

### शक्तिपीठ महामार्गावरून शेतकरी

दिसून येतो. १ किमीसाठी ३५ कोटींचा खर्च येत असताना सरकार १०० कोटींपेक्षा जास्त रूपये शक्तिपीठ महामार्गाला खर्च करत आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील हजारो हेक्टर बागायती जमीन जात असून याचा फटका भविष्यात होणार आहे. असे माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले. शक्तिपीठ कृतीसमितीचे सांगली अध्यक्ष दिंगबर कांबळे यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. कांबळे म्हणाले की, ''सरकार शक्तिपीठ महामार्ग होण्यासाठी पाऊले उचलत आहे. अधिकारी आमच्या बांधावर येऊन पाहणी करत आहेत. याला तीव्र विरोध करण्यासाठी आम्हीही बांधावर थांबून जशास तसे उत्तर देणार आहे. मराठवाड्यासोबतच सांगलीतही शेतकऱ्यांना नोटिसा येत आहे. याविरोधात लातूर येथे राज्यव्यापी बैठक बोलावली आहे. याबैठकीत होणाऱ्या निर्णयानुसार सांगलीसह पश्चिम महाराष्ट्रात तीव्र आंदोलन करणार आहे''. असे दिंगबर कांबळे म्हणाले.

**३२४ किमीमध्ये पर्यावरणीय मूल्यांकन होणार**

पर्यावरण विभागाने दिलेल्या ३२४ किमीमध्ये धाराशिवपासून कोल्हापूरपर्यंत तिसऱ्या टप्प्यात काम होणार आहे. यामध्ये पर्यावरणीय पाहणीसाठी काही अटी व शर्तीसह केंद्राने परवानगी दिली आहे. त्यानुसार प्राधिकरणाने सल्लागारामार्फत पर्यावरणीय मूल्यांकनाचे काम हाती घेतले आहे. येत्या तीन-चार महिन्यांत या पाहणीचा अंतिम अहवाल केंद्राला सादर करण्याचे केंद्रीय पर्यावरण विभागाला सादर करण्यात येणार आहे. पर्यावरण विभागाने दिलेल्या परवानगीमध्ये नदी, पूल, वृक्ष, खोदकामे, शेतीचे नुकसान, जंगलांची व वन जमिनींची हानी याची माहिती घेतली जाणार आहे. कमीत कमी हानी कशी शक्य होईल याचा आराखडा अभ्यास अहवालात असणार आहे.

**गिरीष फोंडे यांच्या निलंबनावर शेतकरी आक्रमक**

शक्तिपीठ विरोधी कृतीसमितीचे समन्वयक गिरीष फोंडे यांना सहायक शिक्षक पदावरून तडकाफडकी निलंबीत करण्यात आले. यावर कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे गिरीष फोंडे यांचे निलंबन मागे घेण्यासाठी शेतकऱ्यांनी निवेदन दिले. गिरीश फोंडे यांचे निलंबन रद्द करा तसेच शक्तिपीठ महामार्ग रद्द करा अन्यथा पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवू असा इशारा शक्तिपीठ विरोधी कृती समितीच्या वतीने देण्यात आला होता. यावर, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी निवेदन स्विकारत मार्ग काढू असे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

--------------

### आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रूड ऑईल ६५

बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आकडेवारीसह पेट्रोल, डिझेलचे दर कसे कमी करता येऊ शकतात हे स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकार असताना आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईलचे दर १४५ डॉलर प्रति बॅरलवर पोहचले असतानाही पेट्रोल ७० रुपये लिटर तर डिझेल ४५ रुपये लिटर होते. मग आता तर क्रूड ऑईल ६५ डॉलर आहे तरीही पेट्रोल, डिझेलच्या किमती कमी केल्या जात नाहीत. युपीए सरकार असताना पेट्रोलवर ९.५६ रुपये तर डिझेलवर ३.४८ रुपये अबकारी कर (एक्साईज टॅक्स) होता, तो भाजपा सरकारने वाढवत ३२ रुपयांपर्यंत केला, काँग्रेसची पत्रकार परिषद सुरु असताना एक्साईज टॅक्स मध्ये आणखी २ रुपयांची वाढ झाली. १ रुपया रोड इन्फ्रास्ट्रक्चर सेस होता तो आता १८ टक्के केला आहे आणि वरून टोल वसुलीही सुरुच आहे, यातील काळेबेरे काय ते समोर आले पाहिजे तसेच कृषी सेस लावून केंद्र सरकार जनतेची लूट करत आहे. एलपीजी सिलिंडरसुद्धा ४०० ते ४५० रुपये होता तो आता दुप्पट झाला आहे. आजच एलपीजी सिलींडरच्या दरात ५० रुपयांची वाढ केली आहे, ही सरकारी लूट आहे, तात्काळ थांबवावी अशी मागणीही यावेळी केली. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, रशिया भारताला बाजारभावापेक्षा ३० टक्के कमी दराने क्रूड ऑईल देते, त्याचा थेट फायदा हा रिलायन्स व नायरा या दोन कंपन्यांना होतो. ह्या दोन कंपन्या सरकारच्या लाडक्या आहेत का? क्रूड ऑईलच्या किमती कमी होत असताना त्याचा फायदा जनतेला न होता ऑईल कपन्यांना होत आहे. स्वस्तातले क्रूड ऑईल घेऊन या कंपन्या युरोपमध्ये विकून नफेखोरी करत आहेत. सर्वसामान्यांना याचा फायदा होण्यापेक्षा सरकार मोठ्या उद्योगपतींना लाभ देत आहे. युपीए सरकार असताना पेट्रोल २ रुपयांनी वाढले तर ट्विट करणारे अमिताभ बच्चन, अक्षयकुमार सारखे सेलिब्रिटी आणि बाबा रामदेव सारखे स्वयंघोषित संत आता पेट्रोल १०९ रुपयांवर असतानाही गप्प आहेत. तर एलपीजी सिलिंडर १५ रुपयांनी वाढले तर रस्त्यावर उतरणारे आता कोठे गायब झाले? असा सवाल करत तेलाचा हा जो काळा खेळ सुरु आहे, त्यावर सरकारने एक श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही यावेळी केली.

----------

### ट्रम्प यांच्या टॅरिफचा बॉम्ब

करण्यास सुरुवात केली. जेपी मॉर्गनच्या अंदाजानुसार, अमेरिका आणि संपूर्ण जगात मंदीची शक्यता ६० टक्क्यांवर पोहोचली आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे अमेरिकेत महागाई तर वाढू शकतेच, पण चीनसारखे देश सूडबुद्धीची कारवाई करू शकतात. त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे. गोल्डमन सॅक्सने २०२५ साठी अमेरिकेचा आर्थिक विकास दर १.५ टक्क्यांवरून १.३ टक्क्यांवर आणला आहे. त्याचवेळी जेपी मॉर्गनचा अंदाज आणखी चिंताजनक आहे. त्यांचा असा विश्वास आहे की २०२५ मध्ये अमेरिकन अर्थव्यवस्था ०.३ टक्क्यांनी संकुचित होऊ शकते.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ८ एप्रिल २०२५


## दारूच्या नशेत कामावर हजर होणाऱ्या कर्मचाऱ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त; महिलांशी अश्लील वर्तन केल्याने संताप

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोविंदवाडी ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेला पाणीपुरवठा कर्मचारी सतत मद्यधुंद अवस्थेत कामावर येत असून, त्याच्या असभ्य वर्तनामुळे संपूर्ण गावात संतापाची लाट उसळली आहे. ग्रामस्थांनी त्याच्यावर तात्काळ कारवाई करून त्याला बडतर्फ करण्याची मागणी केली आहे.

गावातील ग्रामस्थ विनोद दिनकर हंगे यांनी यासंबंधी गावचे सरपंच, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी माजलगाव यांच्याकडे कर्मचाऱ्याच्या अश्या असभ्य वागणुकीबद्दल तक्रार अर्ज सादर करून या कर्मचाऱ्याच्या अयोग्य वर्तनाबद्दल गंभीर आक्षेप नोंदवला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे, सदर कर्मचारी महिलांशी अश्लील व उद्धट भाषेत बोलतो, शिवाय सतत नशेत असल्यामुळे गावातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. ''गावातील शांतता व शिस्त बिघडवत असलेल्या या कर्मचाऱ्याला त्वरित बडतर्फ करून योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी,'' अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या तक्रारीची ग्रामपंचायत कार्यालय व गटविकास अधिकारी गांभीर्याने दखल घेतील का? याकडे आता संपूर्ण गावाचेलक्षलागलेआहे.

# जमात ए इस्लामी हिंद बीडच्या वतीने अर्धमसला गावात स्फोटग्रस्त मस्जिदसमोर ईद मिलन कार्यक्रमाचे ऐतिहासिक आयोजन

### शांततेचा संदेश देत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे उत्कृष्ट उदाहरण; केवळ जिल्ह्याला नव्हे तर संपूर्ण राज्याला शांतता, सौहार्द आणि ऐक्याचा दिला संदेश

बीड । प्रतिनिधी

अर्धमसला (ता. गेवराई, जि. बीड) येथे गावातील मक्का मस्जिद येथे घडलेल्या दुर्दैवी स्फोटाच्या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण होणे अपेक्षित होते. मात्र गावातील सुजाण नागरिकांनी अत्यंत संयम आणि विवेक दाखवत शांतता व सलोखा जपला. या उदात्त वर्तनाची सर्वत्र प्रशंसा होत असतानाच, गावातील सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्यासाठी जमात-ए-इस्लामी हिंद (), बीड शाखा आणि अर्धमसला गावकरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता मक्का मस्जिद ( ज्या मशिदीत आठ दिवसांपूर्वी स्फोट घडविण्यात आले होते ) परिसरात 'ईद मिलन' कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले.






जमात ए इस्लामी हिंद महाराष्ट्राचे सचिव अब्दुल मुजीब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या ऐतिहासिक कार्यक्रमास गावातीलच नव्हे तर आजूबाजूच्या परिसरातील हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सर्व जाती-धर्मातील महिला, पुरुष, युवा, वृद्ध, आणि गावातील आजी-माजी सरपंचांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रम अधिकच वैशिष्ट्यपूर्ण ठरला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले डॉ. रफिक पारनेरकर (पारनेर, अहमदनगर) यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा संदर्भ देत इस्लाम धर्मामधील प्रेम, करुणा, सहिष्णुता आणि शांततेचे मोल अधोरेखित केले. त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून श्रोत्यांना सामाजिक ऐक्य, सहअस्तित्व आणि मानवतेच्या मूलभूत मूल्यांची जाणीव करून दिली. त्यांच्या भाषणाने उपस्थितांमध्ये नवा आत्मविश्वास आणि सद्भावनेचा स्फुरण जागवला.तसेच भागवत तावरे यांनी सामाजिक सलोखा आणि सद्भावना या विषयावर अत्यंत उत्स्फूर्त आणि ऊर्जादायक भाष्य केले.

या कार्यक्रमास बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक () यांचे प्रतिनिधी स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख श्री. उस्मान शेख, तसेच तलवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. नरके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी गावकऱ्यांनी दाखवलेल्या संयमाचे आणि सलोख्याचे विशेष कौतुक करत अशा उपक्रमांनीच सामाजिक सलोखा वाढतो, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात गावातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदवली. यात सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, व्यापारी, युवा संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. त्यांच्यातून एकच संदेश उमटला ''आपण एकत्र राहिलो, तर कोणतीही विघातक शक्ती आपल्याला कमजोर करू शकत नाही.''

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सय्यद शफिक हाश्मी यांनी केले, तर सूत्रसंचालन शेख गयासोद्दीन यांनी अत्यंत उत्तम रीतीने पार पाडले.या वेळी सरपंच बाळासाहेब राऊत,सरपंच अशोक राव थोपटे, जमात ए इस्लामी हिंद बीड चे बीड जिल्हा संघटक सय्यद इफ्तेखार, मौलना अमीन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मंचावर सर्व आजी माजी सरपंच उपस्थित होते. कार्यक्रमाचे शेवटी सय्यद नूर भाई यांनी सर्व उपस्थित आमचे आभार मानले.

कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना खास शीरखुर्म्याची मेजवानी देण्यात आली, ज्यात प्रेम, सन्मान आणि आपुलकीची चव मिसळली होती. या ईद मिलाप कार्यक्रमाने अर्धमसला गावाने केवळ जिल्ह्याला नव्हे तर संपूर्ण राज्याला शांतता, सौहार्द आणि ऐक्याचा संदेश दिला आहे. अशा उपक्रमांची पुनरावृत्ती ही काळाची गरज आहे, आणि अर्धमसला गाव त्याचे जिवंत उदाहरण ठरले आहे.

## आ.नमिता मुंदडाच्या बंगल्यावर भाजपा स्थापना उत्सव साजरा

### जनतेला दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी-डॉ.शरदराव हेबाळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने केज विधानसभा मतदारसंघाच्या आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या आई निवासस्थानी विविध कार्यक्रम संपन्न झाले. ध्वजारोहण, कारसेवकांचा सत्कार, जेष्ठांचा सन्मान, मोटार सायकल रॅली आदी उपक्रम जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले. दरम्यान स्थापना दिना निमित्त बोलताना डॉ.शरदराव हेबाळकर यांनी भारतीय जनता पार्टी म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष, ज्यांनी राष्ट्र मंदिर बांधण्याचा केलेला संकल्प राम मंदिर उभा करूनच दाखवला. ३७० कलम बाजुला करून राष्ट्रभक्तीची ज्योत याच पक्षाने पेटवली. महापूरूषांच्या बलिदानापासुन स्थापन झालेला पक्ष म्हणजे भाजपा हे त्यांनी सांगितले. प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनीही भाजपाच्या ऐतिहासिक वाटचालीची आणि सद्यस्थितीतल्या सुवर्णकाळाची ओळख कार्यकर्त्यांना करून दिली.

महापुरूषांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर शहरातल्या ज्यांनी १९९२ ला कारसेवा




केली, त्यांचा सत्कार आमदाराच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देवुन केला. सौ.शरयुताई हेबाळकर, प्रकाशराव जोशी, कल्याणी जोशी, उन्मेष माथेकर, दामोदर राऊत, रमाकांत सेलमोहकर, विनय जहागिरदार, आप्पाराव यादव, जेष्ठ पत्रकार हणुमंत पोखरकर, मुळे मॅडम, जयंत हमिने आदींचा समावेश होता तर पक्षाचे जेष्ठ नेते कांतीलाल केंद्रे, मामा रेणापुरे, नारायणरावजी केंद्रे, भास्करराव धर्मपात्रे, मोहनराव कराड, शामराव औसेकर, शशीकांत गायकवाड, डॉ.सुधीर धर्मपात्रे,माजी नगराध्यक्ष महादेव मस्के, सभापती काजगुंडे, ॲड.शरदराव इंगळे, अनंतराव आडसुळ आदीसह इतरांचाही सन्मान बैठकीत करण्यात आला. जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी कारसेवा करताना १९९२ साली झाशी येथे तब्बल तेरा दिवस या सर्व सहकार्यांना सोबत घेवुन जेलची सजा भोगली. त्याचे अनुभव कथन त्यांनी केले. अगदीच म्हटलं तर जेलमध्ये आम्ही सारे पेपर टाकुन झोपायचो. अन्नपाणीही पोलीसांनी खावु दिलं नव्हतं. स्व.प्रमोद महाजन, गोपीनाथराव मुंडे, विमलताई मुंदडा आदींच्या आठवणी त्यांनी यावेळी सांगितल्या. या मतदारसंघात पक्षाच्या माध्यमातुन काम करताना मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रितमताई यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वांना सोबत घेवुन काम करतो. माणसं जोडणं आणि एकत्रित रहाणं ही खर्या अर्थाने आता काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कांतीलाल दादा केंद्रे यांनी जुन्या काळातील अनुभव सांगताना वर्तमान भाजप पक्षाला आलेले चांगले दिवस आणि या काळात असलेले कार्यकर्ते खरे भाग्यवान असल्याचे सांगितले. प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी भाजपा हा संस्कार आणि व्यक्तिमत्व घडवणारा पक्ष असुन जबाबदारी आणि कर्तव्य जाण ओळखुन कार्यकर्ता काम करतो. पक्षात काम करताना निष्ठा अत्यंत महत्वाची असुन जनसंघाच्या स्थापनेपासुन पक्षाची झालेली वाटचाल आणि राज्यात पक्ष वाढीसाठी स्व.गोपीनाथराव मुंडेंचे असलेले योगदान याची ओळख त्यांनी करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना शरदराव हेबाळकर म्हणाले की, राजकिय व्यवस्थेत भाजपा म्हणजे लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करणारा पक्ष अशी त्याची ओळख. ज्या पक्षाने स्थापन होताना ३७० कलम बाजुला करू, प्रभु रामचंद्रांचं मंदिर बांधु हे सांगितलं ते पुर्ण करायला आजचा दिवस उजाडला. प्रकाश बोरगावकरांनी सुत्रसंचालन केले. अनंतराव आडसुळ त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी उत्सव घडवुन आणल्याचं कौतुक मुंदडांनी केले.

## रोजगार मेळाव्यातून ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जालना व मत्स्योदरी शिक्षण संस्था महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ एप्रिल, २०२५ रोजी बेरोजगार तरुणांसाठी जालना येथील मत्स्योदरी शिक्षण संस्था महाविद्यालय, जालना येथे ''पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' व ''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळावा'' पार पडला. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी कळविले आहे.

या रोजगार मेळाव्यात ०८ नामांकित कंपनीचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मुलाखतीतून ८४ उमेदवारांची विविध पदाकरिता प्राथमिक निवड केली. यात प्रीम सोल्यूशन प्रा. लि. (सलाम किसान) जालना ०८, प्रीम सोल्यूशन प्रा. लि. जालना ०३, कलश सीड्स प्रा. लि. जालना १५, एस.बी.आई इन्शुरेंस कंपनी लि. जालना ११, राजुरी स्टील्स टी एम टी बार्स प्रा. लि. जालना १६, प्रथम एजुकेशन फाउंडेशन छ. संभाजीनगर १०, रिध्दी सिध्दी सर्व्हिसेस, जालना ०७, भाग्य लक्ष्मी रोलींग मिल्स प्रा. लि. जालना १४ याप्रमाणे उमेदवारांची निवड केली आहे

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. माधव ढेरे यांनी केले तर आभार सुरेश बहुरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे तसेच डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदिप डोळे, सुभाष पंडित, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, अमर तुपे, निर्मल बिडकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. संजय पाटील उप प्राचार्य, डॉ. संतोष करवंदे, डॉ. रामनाथ सांगळे, डॉ. कार्तिक गवांडे, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. रामदास वैद्य यांनी तसेच महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

## उन्मेश पाटील व अविनाश काळे यांना मूकनायक पुरस्कार जाहीर

### प्रसिद्ध साहित्यिक योगीराज वाघमारे यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान होणार

कळंब । प्रतिनिधी

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक मध्यवर्ती जयंती उत्सव समिती कळंब यांच्या वतीने विचार संवर्धन महोत्सव अंतर्गत कळंब येथे पहिले छत्रपती शिवाजी महाराज साहित्य संमेलन शुक्रवार दिनांक ११ एप्रिल आणि शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी संपन्न होत आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक वर्तमानपत्र सुरू केले होते हा एक व समाज परिवर्तन व प्रबोधन चळवळीतील महत्त्वाचा टप्पा आहे मुकुनायक सुरू केले होते याच्या







शताब्दी निमित्त पत्रकार क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल कळंब येथील दैनिक लोकमतचे पत्रकार उन्मेश पाटील, उमरगा येथील दैनिक सकाळचे पत्रकार अविनाश काळे यांना मूकनायक पुरस्कार साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रा. संजय कांबळे यांनी जाहीर केला आहे या पुरस्कारार्थी पत्रकारांचा गौरव संमेलन उद्घाटन सत्रात शुक्रवार ११ एप्रिल रोजी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते संपन्न होत आहे तर प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे सोलापूर यांचा साहित्यातील योगदानाबद्दल जीवन गौरव ,सन्मानपत्र देऊन सहृदय सत्कार साहित्य संमेलन समारोप कार्यक्रम १२ एप्रिल शनिवार दुपारी ४.०० वाजता संमेलन स्थळी नगरपरिषद सांस्कृतिक भवन मेन रोड कळंब येथे संपन्न होत आहे.

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांना आधारसह कागदपत्रे पडताळणी करून रुजू करा

जालना । प्रतिनिधी

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयान्वये ''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना'' सुरु करण्यात आली आहे, या शासन निर्णयानुसार प्रशिक्षणार्थींना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येत होते. आता मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन थेट ऑनलाईन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. तरी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांनी आधारसह संबंधित शैक्षणिक कागदपत्रे सादर करावी, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

पान ६ वरून...

### राक्षसभुवन भाविकांच्या

भक्तांना कथा कीर्तन श्रवण करण्यासाठी भव्य स्वरूपामध्ये मंडप उभारण्यात आला आहे. त्याचबरोबर देव देवतांसाठी तात्पुरत्या स्वरूपाचे मंदिर (देवघर) करण्यात आले आहे तर आलेल्या भाविक भक्तांना भोजनाची व्यवस्था करण्यासाठी स्वयंपाक ग्रहाची उभारणी करण्यात आली आहे. गावामध्ये सर्वत्र साफसफाई करून जागोजागी पिण्याच्या पाण्यासह सांडपाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अगदी दोन दिवसांवर आलेल्या सप्ताह सोहळ्यासाठी प्रत्येक घर आणि घराचे अंगण सुसज्ज सजवले आहे. यामुळे राक्षसभवन या गावांमध्ये सप्ताह पूर्वीच मंगलमय वातावरण पाहायला मिळत आहे.

### कडा येथे शिवशंभो प्लंबिंग

नालकोल, ठाकाजी कसाब,अविनाश पोकळे, संदीप जगदाळे भागचंद काळे, अनिल सायंबर,सुधीर सायंबर,नाना आमले,दादा ढोबळे, गोकुळ काळे, सूरज काकडे पाटील,अमोल तळेकर,विठ्ठल मिसाळ, विठ्ठल तांदळे, अमोल रांजणे,अनिल मोहिते, बाळासाहेब नवले,दत्ता सायंबर,अर्जुन घोडके , संदीप सुंबे, या दालनाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत दादासाहेब घोडके,आरुण घोडके यांनी केले.

### ...तर तहानलेल्या नागरिकांसाठी

वाढती उष्णता आणि त्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई यासंदर्भात त्यांनी वास्तविकतेवर आधारित चर्चा केली. मागील अनेक दिवसांपासून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे. या प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील पाण्याची टंचाई काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन पाणी सोडावे अन्यथा नागरिकांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी संघर्ष करावा लागला तरी तो करण्याची आपली तयारी असल्याची भूमिका राजेभाऊ फड यांनी मांडली. यावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी लवकरात लवकर कार्यवाही करू आणि कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्याचे आदेश देऊ असे आश्वासन दिले आहे.

### उद्योग उभारणीसाठी

व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### झालेत गुलाम मोकळे

सुमेध जोगदंड यांनी केले. सूत्रसंचालन सचिन वडमारे,सुनिल डोंगरे तर आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी केले.जयभिम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## वृत्तनिवेदीका निखिला म्हात्रे व बुलढाणा अर्बन बँकेचे संस्थापक राधेश्यामजी चांडक यांची अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात नावाजलेल्या ९ या मराठी वृत्तवाहिनीच्या लोकप्रिय वृत्तनिवेदीका निखिला म्हात्रे तसेच बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक राधेश्यामजी चांडक (भाईजी) हे अंबाजोगाई शहरात काही कामानिमित्त आले असतांना त्यांनी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी अंबाजोगाई पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, संचालक प्रा वसंत चव्हाण, ॲड विष्णुपंत सोळंके, बाबू पटेल ९ चे प्रतिनिधी संभाजी मुंडे हे उपस्थित होते.

प्रथमतः या दोन्ही पाहुण्यांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. उभयतांच्या या भेटीमध्ये राजकीय, आर्थिक तसेच पत्रकारिता क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा झाली. हल्लीच्या काळात वृत्तवाहिन्या



या आपला टीआरपी वाढविण्यासाठी एकमेकांत जीवघेणी स्पर्धा करत आहेत. या स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी व टिकण्यासाठी वृत्त वाहिन्या देखील आपल्या पत्रकारांना घडणाऱ्या किंवा घडत असलेल्या घटनांचे वार्तांकन करण्यासाठी त्यांना पळवत आहेत. हे करताना अनेकदा ग्लॅमरच्या पाठीमागे वाहिन्या जास्तवेळ पळताना आढळून येतात. यामुळे एखाद्या सामान्य माणसाच्या घटनेची किंवा सामान्य शेतकऱ्यांची बातमी कधी कधी तशीच मागे राहून जाते अशी स्पष्ट भावना सुप्रसिद्ध वृत्तनिवेदीका निखिला म्हात्रे यांनी या भेटीदरम्यान बोलून दाखविली. अंबाजोगाई सारख्या छोट्याशा शहरातील राजकीय , सांस्कृतिक व शैक्षणिक सुधारणा पाहून आनंद व्यक्त केला. राजकिशोर मोदी यांनी सुरू केलेल्या अंबाजोगाई पिपल्स बँकेची आर्थिक वाटचाल व येथील आर्थिक भरभराट पाहून निखिला म्हात्रे यांनी मोदी यांचे अभिनंदन देखील केले.

बुलढाणा अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक राधेश्यामजी चांडक यांनी देखील अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची मार्च २०२५ अखेरची आर्थिक परिस्थिती पाहून आनंदच व्यक्त केला. मार्च २०२५अखेर अंबाजोगाई पिपल्स बँकेने ५७३ कोटींचा व्यवसाय करत ६ कोटी ६३ लाखांचा नफा मिळवल्याबद्दल बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी व त्यांचे सर्व संचालक सहकारी तसेच बँकेचे सर्व कर्मचारी, ग्राहक व ठेवीदार यांचे अभिनंदन केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचा आदर्श यापुढे आपणही घेऊ असा आशावाद राधेश्यामजी चांडक यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# पीकविम्यात शेतकऱ्यांऐवजी कंपन्यांचेच भले

## ५ वर्षांमध्ये विमा कंपन्यांना ५० हजार कोटींच्या दरम्यान नफा

पुणे: पीकविमा योजनेत मागील ५ वर्षांमध्ये विमा कंपन्यांना ५० हजार कोटींच्या दरम्यान नफा झाला. त्यातही मागील ३ वर्षांमध्ये शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई कमी होत गेली. मागील ५ वर्षात विमा कंपन्यांना शेतकरी, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्याकडून एकूण १ लाख ५४ हजार कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. तर विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना १ लाख ४ हजार कोटी रुपयांची विमा भरपाई दिली, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयाने संसदेत विचारेलेल्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरातून मिळाली.

पीक विमा योजना नेहमीच वादात राहीली आहे. मागील ५ वर्षांचा विचार केला तर देशभरातील शेतकऱ्यांना पीक विम्यातून मिळणारी भरपाई कमी होत गेली. केंद्रीय कृषी मंत्रालयाने १ एप्रिल रोजी एका प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात माहीती दिली. या माहीतीवरून स्पष्ट झाले की, १०१९-२० ते २०२३-२४ या वर्षांमध्ये विमा कंपन्यांचा नफा वाढतच गेला. त्यातही मागच्या तीन वर्षातील नफा जास्त आहे. त्यामुळे सुरुवातीला पीक विम्यातून बाहेर पडलेल्या कंपन्या पुन्हा पीकविमा राबविण्यासाठी येत आहेत. मागील ५ वर्षात विमा कंपन्यांना शेतकरी, राज्य सरकार आणि




केंद्र सरकार यांच्याकडून एकूण १ लाख ५४ हजार कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. तर विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना १ लाख ४ हजार कोटी रुपयांची विमा भरपाई दिली. सरकारने दिलेल्या माहीतीनुसार विमा कंपन्यांना २०२१-२२ ते २०२३-२४ या तीन वर्षांमध्ये ३४ हजार ३७३ कोटी रुपयांचा नफा मिळाला. विमा कंपन्यांना या तीन वर्षांमध्ये शेतकरी, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून एकूण ९० हजार ६९८ कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. तर विमा कंपन्यांनी देशभरातील शेतकऱ्यांना ५६ हजार ३२५ कोटी रुपयांची विमा भरपाई वाटली. या तीन वर्षात शेतकऱ्यांनी १० हजार ९३७ कोटी रुपयांचा विमा हप्ता भरला होता. विमा कंपन्यांना २०१९-२० आणि २०२०-२१ या दोन वर्षांमध्ये विमा कंपन्यांना काहीसा कमी नफा राहीला होता. विमा कंपन्यांना या दोन वर्षांमध्ये ६३ हजार ९२६ कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. तर विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना ४९ हजार १९२ कोटी रुपयांची भरपाई वाटली. या तीन वर्षीमध्ये विमा कंपन्यांना एकूण १४ हजार ७८४ कोटी रुपयांचा नफा झाला. सरकारने दिलेल्या माहीतीनुसार देशात पीक विमा योजनेत एकूण १८ कंपन्यांनी काम केले. यात ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया अर्थात एआयसी कंपनीचा जास्त वाटा आहे. एआयसीने २०२३-२४ च्या हंगामात देशात शेतकऱ्यांना ५ हजार ५६५ कोटी रुपयांची विमा भरपाई वाटली. मात्र एआयसीला विमा हप्त्यातून ९ हजार ४९० कोटी रुपये मिळाले होते. रिलायंस जनरल कंपनीला २०२३-२४ मध्ये विमा हप्त्यातून एकूण ३ हजार ७८४ कोटी रुपये मिळाले होते. त्यापैकी या विमा कंपनीने केवळ १ हजार २६९ कोटी रुपयांची विमा भरपाई वाटली. एचडीएफसी एर्गो कंपनीला विमा हप्त्यातून ३ हजार २७६ कोटी रुपये मिळाले होते. त्यापैकी विमा कंपनीने ५५७ कोटी रुपयांची भरपाई वाटली.

# उन्हाळ्यात पिकांसाठी आच्छादन ठरते फायदेशीर



पिकांच्या वाढीसाठी माती आणि त्यातील ओलावा या दोन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. जमिनी सतत सूर्यप्रकाशामध्ये राहिल्यास मातीतील ओलाव्याचे अधिक दराने बाष्पीभवन होते. पर्यायाने पिकांच्या वाढीसाठी सिंचनाचे प्रमाण वाढवावे लागते. मात्र ऐन उन्हाळ्यामध्ये मुळात पाण्याची कमतरता असताना सिंचन देणे अनेक शेतकऱ्यांना शक्य होत नाही. अशा स्थितीत पिकाचे उत्पादन घटते. हे टाळण्यासाठी विविध प्रकारच्या आच्छादनाचा वापर करणे गरजेचे आहे. जमिनीवर विविध प्रकारच्या पदार्थांचा वापर करून जमीन झाकणे, याला आच्छादन (मल्चिंग) असे म्हणतात. त्यामुळे जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासोबतच तणांच्या वाढीला अटकाव केला जातो. सावली आणि ओलावा मिळाल्याने जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. ते अधिक क्रियाशील राहिल्याने पिकांना आवश्यक ती अन्नद्रव्ये उपलब्ध होण्यास मदत होते.

सेंद्रिय आच्छादन : गवत व पेंढा - गवते किंवा त्याचा पेंढा जमिनीवर पिकाच्या दोन ओळीमध्ये, फळबागेमध्ये झाडांच्या भोवती पसरला जातो. कंपोस्ट - कंपोस्ट खते देताना ती जमिनीवर पसरून आच्छादन होईल, अशा प्रकारे द्यावीत. होतेच परंतु त्याचबरोबर मातीची सुपीकता व रचना सुधारण्यास मदत होते. लाकडाचा भुसा व साल - लाकडाचा भुस्सा व साली या सावकाश कुजतात. त्यांचा वापर आच्छादनासाठी केल्यास मातीचे भौतिक गुणधर्म सुधारण्यास मदत होते. गवताचे तुकडे - वाळलेल्या गवताच्या तुकड्यांमुळे आच्छादन तयार होते. हे पदार्थ वेगाने कुजतात. त्यातून जमिनीत सेंद्रिय पदार्थांची वाढ होते. झाडाचा पालापाचोळा - फळबागेमध्ये होत असलेली पानगळ किंवा अन्य झाडांची वाळलेली पाने, पालापाचोळा जमिनीवर विखरून टाकल्यास त्याचे आच्छादन होते.

असेंद्रिय किंवा अजैविक आच्छादन : आच्छादनामध्ये विविध खडक, प्लॅस्टिक पेपर, रबर फॅब्रिकपासून बनलेल्या पदार्थांचा वापर केला जातो. हे असेंद्रिय पदार्थ लवकर कुजत नाहीत. त्यामुळे वारंवार बदलण्याची गरज भासत नाही. अलीकडे अजैविक आच्छादनामध्ये प्लॅस्टिक पॉलिथिन पेपरचा वापर वाढत आहे. यामध्ये विविध रंग, जाडीचे पॉलिथिन शीट उपलब्ध होत आहेत.

पारदर्शक पॉलिथिन पेपर : पारदर्शक पेपरमुळे बियाण्यांची उगवण क्षमता चांगली होते. रोगमुक्त रोपवाटिकांसाठी उपयोगी पडते. पारदर्शक पेपर मुळे सूर्यप्रकाश आरपार जाऊन तणांची वाढ होते. हे टाळण्यासाठी पेपर पसरविण्याआधी जमिनीवर योग्य त्या तणनाशकाची फवारणी करणे अनिवार्य ठरते.

काळा पॉलिथिन पेपर : दोन्ही बाजूने काळा आच्छादन पेपर जमिनीवर अंथरल्यास जमिनीवर सूर्यप्रकाश पोहचत नाही. प्रकाश संश्लेषण क्रियेअभावी तणांची वाढ होत नाही. या प्रकारच्या पेपरमुळे जमिनीतील ओलावा टिकून राहतो. मातीचे तापमान वाढत असल्याने हानिकारक सूक्ष्मजीवांचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते.

दुहेरी रंगाचा पॉलिथिन पेपर : दुहेरी रंगांच्या प्लास्टिक पॉलिथिन पेपरची रचना ही प्रामुख्याने विशिष्ट तरंगलांबीचा प्रकाश शोषून घेण्यासाठी व त्याचवेळी विशिष्ट तरंगलांबीचा प्रकाश परावर्तित करण्यासाठी केलेली असते. त्याचा फायदा पिकांच्या वाढीसाठी व फळांच्या गुणवत्तावाढीसाठी होतो.

# भारतातील टॉप पाच गायी

देशात तसेच राज्यात गाईचे पालन मोठ्या प्रमाणात होते. गाई पालन हे इतर पशुपालनाच्या तुलनेने सोपे असल्याने अनेक शेतकरी गाई पालनास पसंती दर्शवतात. भारतात जवळपास २६ गाईंच्या जातींचे पालन केले जाते, यातील काही प्रमुख टॉप ५ गाईच्या जाती विषयी जाणून घेतल्यास दुग्ध व्यवसायात यशस्वी होण्यासाठी पशूची योग्य जात निवडणे महत्वाचे ठरते. पशुपालन जर केवळ दुग्धोत्पादनासाठी केले जात असेल तर दुग्ध क्षमता उत्तम असलेल्या पशूंच्या पालन केले जाते देवणी : देऊनी गाय महाराष्ट्रातील एक गावरान गाय आहे, देवणी गाय ही पाळीव जनावराची जात मुख्यतः कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यातील काही जिल्ह्यात पाळले जाते.

या गाईचे पालन सर्वात जास्त मराठवाड्यात केले जाते. अलीकडे राज्यातील इतर भागात देखील या गाईचे पालन मोठ्या प्रमाणात होत आहे. मराठवाड्यातील लातूर, नांदेड, बीड, परभणी तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात देवणी गाय प्रकर्षाने दिसून येते. या गाईला स्थानिक शेतकरी मराठवाड्याची कामधेनु असे देखील म्हणतात. देवणी गाय एका दिवसाला सात लिटरपर्यंत दूध देण्यास सक्षम असल्याचे सांगितले जाते. ही गाय एका वेतात जवळपास बाराशे लिटर दूध देण्यास सक्षम असते.

खिल्लार : राज्यातील पश्चिम भागात या गाईचे पालन मोठ्या प्रमाणात केले जाते, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, कोल्हापूर आणि सातारा या जिल्ह्यांत ही गाय प्रामुख्याने आढळते. खिल्लार गाय एका वेतात सुमारे १००० लिटर दूध देण्यात सक्षम असल्याचे कृषी वैज्ञानिक नमूद करतात. या वंशाची गाय दिवसाला ३ ते ६ लिटर दूध देते. तसेच जर मुक्तगोठा असेल आणि वासरू सोबत असेल तर यांना दिवसातून ५ ६ वेळा पान्हा फुटतो. पण इतर गोवंशापेक्षा या खिल्लार गोवंशाचे दूध हे आरोग्यास उत्तम आहे. महाराष्ट्रामध्ये दिवसाला १० लिटर दूध देणाऱ्या देखील जातिवंत खिल्लार गाई पाहायला मिळतात.

गौळावू (गवळाऊ) : गौळावू गाय हा देशी गोवंश आहे. या गायीची प्रजाती



महाराष्ट्रातील विदर्भ भाग आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये आढळते. विदर्भातील नागपूर व वर्धा या दोन जिल्ह्यात ही गाय मोठ्या प्रमाणात आढळत असते. हा गोवंश नंद गवळी या लोकांकडून पाळला जातो आणि इतर शेतकऱ्यांना ते बैल आणि गाय विकतात. तो त्यांचा व्यवसाय आहे. या गायीच्या दुधामध्ये फॅटचे प्रमाण ५.५ इतके असते. गवळाऊ गायी कृष्णाच्या काळातील असल्याचे सांगितले जाते. देशी गायीचे गोमूत्र आणि शेण जमीन, पिकांसाठी-शेती साठी खुप उपयुक्त असते. त्यामुळे देशी गोवंश वाचविणे आज गरजेचे झाले आहे. गवळाऊ गाय एका वेतात ८०० लिटरपर्यंत दूध देण्यास सक्षम असते.

राठी : दूध उत्पादनासाठी या गाईचे पालन करण्याची शिफारस केली जाते. राठी गाय हा राजस्थानातील देशी गोवंश आहे.

राजस्थानमधील उत्तर-पश्चिम भागातील गंगानगर, बीकानेर आणि जैसलमेर या भागात पशुपालक या गायीचे पालन मोठ्या प्रमाणात करतात. जास्त दूध उत्पादनामुळे ही गाय प्रसिद्ध आहे. या शिवाय गुजरात राज्यातही राठी गायीचे मोठ्या प्रमाणात पालन केले जाते. वयस्क राठी गायीचे वजन २८० ते ३०० किलो तर राठी बैलाचे वजन ३०० ते ३५० किलोपर्यंत होते. राठी जातीच्या गायीचा रंग भूरकट पांढरा किंवा काळा पांढरा असा मिश्र असतो. राठी गायीची जात अधिक दूध देणारी म्हणून प्रसिद्ध आहे. ही गाय दिवसाला ८ ते १२ लिटर दूध देते. काही ठिकाणी तर १८ लिटरपर्यंत दूध देणाऱ्या राठी गायी पहाण्यात आल्या आहेत. राठी जातीचे बैल मेहनतीला फारच चांगले असतात. उन्हाळ्याच्या दिवसातही या जातीचे बैल सलग १० तास काम करू शकतात. राजस्थानच्या वाळूमय प्रदेशातही हे बैल भरपूर वजणाच्या सामानाची ने-आण करण्यासाठी उपयुक्त ठरतात. विशेषत: ही राठी गाय भारतातील कोणत्याही प्रदेशातील वातावरणात चांगली राहू शकते. या गायीला राजस्थानची कामधेनू असे म्हणतात. राठी गाय एका वेतात जवळपास अकराशे ते बाराशे लिटरपर्यंत दूध देण्यास सक्षम असते.

साहिवाल : देशातील सर्व सर्वोत्कृष्ट गायीच्या जातींत साहिवाल ही गाय मोडते. सहिवाल गाय हा पंजाब राज्यातील देशी गोवंश आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील संयुक्त पंजाब राज्यातील मांटगुमरी जिल्हा आणि रावी नदीकाठचे लायलगूर, लोधरान, गंजीवार आदी परिसरात सहवाल गाय दिसून येत असे. जास्त करून उत्तर पंजाब राज्यात ही गाय जास्त प्रमाणात पाळली जाते. मुख्यत: पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार व मध्य प्रदेशातही या गायीचे पालन केले जाते. एक वेळ वेल्यानंतर ही दहा महिन्यापर्यंत दूध देते. विशेष म्हणजे एका वेळी १० ते १६ लिटर दूध देण्याची क्षमता या गायीमध्ये आहे.




## जागतिक दिवस: 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

### महत्वाच्या घटना

१६६९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपल्या सैनिकांना हिंदुची सर्व धार्मिक स्थळे, मंदिर, शाळा उध्वस्त करण्यास सांगितले.
१८६० : फ्रेंच देशातील प्रकाशक, पुस्तक विक्रेता आणि शोधक एडुअर्ड-लिओन स्कॉट डी मार्टिनविले यांनी सर्वप्रथम मानवी आवाजाचे ध्वनीमुद्रण केलं.
१८६७ : रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत 'एक' मताने मंजुरी मिळाली.
१९४० : दुसरे महायुद्ध : जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.
१९५३ : वॉर्नर बंधूंचा पहिला त्रिमितीय (३ ) चित्रपट, हाऊस ऑफ वॅक्स, प्रदर्शित झाला.
१९६७ : बोइंग-७६७ ने पहिले उड्डाण केले.
१९९४ : सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना 'आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान
१९९५ : लता मंगेशकर यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मोतीलाल व्होरा यांच्या हस्ते 'अवधरत्न' व साहू सूरसम्मान' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.
२००३ : इराक देशातील लोकांना सद्दाम हुसेन यांच्या तानशाही पासून मुक्ती मिळाली.
२००५ : प्रिन्स चार्ल्सचा कॅमिला पार्कर-बोल्सशी विवाह संपन्न.
२०११ : प्रख्यात भारतीय समाजसेवक अण्णा हजारे दिल्ली येथे लोकपाल बील कायदा पास करण्यासठी करीत असलेले आमरण उपोषण सरकारने आपली मागणी मान्य केल्यानंतर बंद केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग मंगोल सरदार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)
१७७० : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.
१८२८ : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (मृत्यू: २५ जुलै १८८०)
१८८७ : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ आक्टोबर १९५०)
१८९३ : राहूल सांकृतायन इतिहासकार (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)
१९२५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (मृत्यू: २१ आक्टोबर १९९५)
१९२९ : भारतीय पद्मभूषण, पद्मश्री, संगीत-नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित शरण राणी यांचा जन्मदिन.
१९३० : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म. १९४८: जया भादुरी अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

५८५ : ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)
१६२६ : सर फ्रँन्सिस बेकन इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (जन्म: २२ जानेवारी १५६१)
१६९५ : वैशाख शु. ६ शके १६१७ पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली. भर्तृहरीच्या शतकत्रयीचा अनुवाद आणि यथार्थदीपिका ही गीतेवरील टीका हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १६०७)
१९०१ : भारतीय रहस्यवादी, तत्वज्ञ, विद्वान, सुधारक व जैन कवी श्रीमद श्रीरामचंद्र यांनी समाधी घेतली.
१९५२ : प्रख्यात काश्मीर खोऱ्यातील कवी महजूर यांचे निधन.
१९८१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी दुर्गाबाई देशमुख यांचे निधन.
१९९४ : चंद्र राजेश्वर राव स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणाच्या लढ्याचे प्रवर्तक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९१४)
१९९८ : डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: २२ जून १९०८)
२००१ : बेहराम कॉन्ट्रॅक्टर ऊर्फ 'बिझी बी' पत्रकार व स्तंभलेखक, 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरियर' या सायंदैनिकाचे संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३०)
२००१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: ११ जुलै १९२१)
२००९ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (जन्म: १३ जानेवारी १९२६)
२००९ : अशोकजी परांजपे गीतकार (जन्म:)

# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यावयाची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.



# घरकुलांचे बांधकाम रखडले वाळु घाटांचा लिलाव सुरू करा

» घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळूचा शासन आदेश पारीत करा

» जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

बीड। प्रतिनिधी

सर्वांसाठी घर हे केंद्र शासनाचे धोरण असुन त्यानुसार बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळावे या हेतूने केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येतात.पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना अहिल्यादेवी आवास योजना सह इतर योजनातून बीड जिल्ह्यात जवळपास ७६६६५ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.मात्र वाळु अभावी घरकुलांची बांधकामे रखडली असल्याचे सर्वत्र चित्र दिसुन येत आहे.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी घोषणा केल्याप्रमाणे घरकुल धारकांना मोफत ५ ब्रास वाळु देण्याचे शासन आदेश काढण्यात यावेत, राज्य शासनाच्या वाढीव ५० हजार रूपयांच्या अनुदानातुन १५ हजार सोलरवर खर्च करण्याची अट रद्द करण्यात यावी. बीड जिल्ह्यात वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत.जवळपास४०-५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते.वाढत्या महागाईत गोरगरीब घरकुल धारकांना ती परवडत नाही त्यामुळे वरील मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०७ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री



, महसूलमंत्री, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख, पांडुरंग हराळे, जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाभियान योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरीता रमाई आवास योजना, अनुसूचित जमाती करीता शबरी आवास योजना व आदिम आवास योजना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता '' यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व ईतर मागास वर्ग प्रवर्गासाठी मोदी आवास योजना,अहिल्यादेवी आवास योजनांसह घरकुलांच्या ईतर योजनातुन जवळपास ७६ हजारांच्या पुढे घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.मात्र प्रशासनाचे वाळु टेंडर झालेले नाही. जी वाळु बांधकाम कामगारांना घ्यावी लागते ती जवळजवळ ४० ते ५० हजारांना ५-६ ब्रास वाळू मिळते. एवढ्या मोठ्या रकमेची महागडी वाळु घेऊन घरकुलाचे बांधकाम करणे शक्य नसल्याने केवळ आणि केवळ वाळुमुळे घरकुलाचे बांधकाम रखडलेले आहेत. मध्यंतरी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल धारकांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली.मात्र त्याचा शासन आदेश न आल्याने घरकुल धारकांना वाळु मिळत नाही. त्यामुळे शासन आदेश पारीत करण्यात यावेत. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ (सन २०२५ ते सन २०२८-२९) अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्यातुन ५०,००० ईतकी अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे. मात्र यापैकी ३५ हजार रूपये बांधकामासाठी आणि १५ हजार रुपये सरकार प्रधानमंत्री सुर्यघर योजनेंतर्गत सौर ऊर्जा यंत्रणेसाठी खर्च करणार असुन जे ही यंत्रणा उभी करणार नाहीत त्यांना १५ हजार मिळणार नाहीत.हि जाचक अट रद्दबातल करण्यात यावी. सध्या बीड जिल्ह्यात एकही वाळूघाट सुरू नाही. दोन महिन्यांनंतर पावसाळ्याला सुरूवात होणार आहे. बीड जिल्ह्यात वाळू घाटांचे लिलाव स्थगित करण्यात आले आहेत. शेजारच्या जिल्ह्यामध्ये मात्र वाळूघाट सुरू आहे. परिणामी बीड जिल्ह्यात गोरगरिबांना वाळू मिळणे अवघड झाले असून त्यांचा बांधकामाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे जिल्ह्यात तातड्याने वाळु घाटांचे स्थगित लिलाव सुरू करण्यात यावेत.

## शासकीय कार्यालयात निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी

उल्हास गिराम यांची जिल्हाधिकारी यांना मागणी



बीड। प्रतिनिधी

वाढत्या तापमाणामुळे बीड जिल्यात उष्णतेच्या झलाया वाढत आहेत. उषाघात, मळमळ, चक्कर येणे असे प्रकार वाढत आहेत. शासकीय कामानिमित्त शहरी व ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणावर युवक, महिला, वयोवृद्ध येतात. काहींना दिवसभर ताटकळत बसावे लागते. अशा नागरिकांना प्रखरउन्हाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्यातील प्रत्येक कचेरी कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याचा पाण्याची सोय करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जिल्हाधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

येणारे तीन महिने प्रखर उष्णतेचे असतील. उष्माघाताच्या घटना वाढण्या आगोदर प्रशासनाने खबरदारी घ्यावी. वेळीच उपाययोजना कराव्यात. विविध शहरात बसस्थानाकाची कामे सुरु आहेत, त्याठिकाणी ही निवारा असावा. जिल्ह्यातील सर्वच प्रत्येकी तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, सत्र न्यायालय, निबंधक कार्यालय या सह श्यक्य होईल त्या प्रशासकीय कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक साहेब यांची भेट घेऊन सदरील मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या वेळी त्यांच्या समवेत उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडेकर, राजु भाऊ मुहावले, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, शिरूर तालुका सोपान मोरे, कामगार सेनेचे रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, गणेश घुबर्डे, प्रदीप कोटुळे, सतीशसिह परदेशीं, साईनाथ ढाकणे, दिलीप नाना पवार यांच्या सह आदी उपस्थित होते.

## थोडक्यात



### चौसाळ्यात रामनवमी साजरी

चौसाळा । प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षाची चौसाळा ता. बीड येथे बालाजी मंदिरात ग्रामस्थांनी रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला तर अनेक भाविक भक्तांनी मंदिरात येऊन श्रीराम मूर्तीचे दर्शन घेतले चौसाळा येथील नागरिकांची बालाजी मंदिरात रामजन्माच्या ऊत्सव केला महाप्रसादाच्या आयोजन करण्यात आले अनेक नागरिकांनी महाप्रसादाचे लाभ घेतला या राम जन्म उत्साहात विक्रम नाईकवाडे इंजिनिअर जिवन जोगदंड नाना शिंदे नाना शिंदे फौजी मधुकर अवताडे नवनाथ अवताडे संदेश खिंवसरा मधुकर तोडकर अतुल भैया शिंदे विष्णू कळासे आदी मान्यवर नि भाग घेतला

### चौसाळा येथे शिवलीला ताई पाटील यांचे कीर्तन

चौसाळा : येथील चंदन शहावली या देवस्थानचा उरूस निमित्त शिवलीला ताई पाटील विश्व माऊली अध्यात्मिक मुलीची वारकरी शिक्षण संस्था यांचे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी बुधवारी रात्री ०९ ते १२ दरम्यान हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे तरी सर्व भाविकांनी या कीर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा अशे आव्हान चौसाळ्याचे सरपंच उपसरपंच तथा कमिटीचे अध्यक्ष सदस्य यांच्यासह नागरिकांनी केले आहे



## वक्फ बिल रद्द करा पाटोद्यात धरणे

वक्फ से छेडछाड संविधान से छेडछाड



पाटोदा। प्रतिनिधी

वक्फ बोर्ड बील दुरूस्ती विधेयक २०२५ तात्काळ रद्द करा, गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मस्जीदमधील स्फोट प्रकरणातील आरोपींना फाशी द्या आणि पाटोदा तालुक्यात अनेक ठिकाणी असलेली वक्फची जागा मुस्लीम कब्रस्तानसाठी देण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी पाटोदा येथील

उपविभागीय कार्यालयासमोर आज मुस्लीम समाजासह इतर संघटनांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

पाटोदा येथील उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून वक्फ बील रद्द करा म्हणून घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या

निवेदनात म्हटले आहे की वक्फ बील तात्काळ रद्द करा, मुस्लीम समाजाविषयी चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्या नेत्यांवर कारवाई करून त्यांना आळा घालावा, मुस्लीम समाजाच्या संरक्षणासाठी कायदा करावा, मुस्लीम समाजाच्या मुलांना बेकायदेशिरपणे अटक करण्यात आली असुन त्यांची चौकशी करून त्यांना सोडण्यात यावे, मॉबलिंचींगच्या नावाने मारहाण करून कायदा हातात घेणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. एकदिवसीय धरणे आंदोलन करून सकल मुस्लीम समाजाच्या एक हजार सह्याचे निवेदन प्रशासनामार्फत शासनाला देण्यात आले. निवेदनावर शेकडो मुस्लिम बांधवासह सामाजिक हित जोपासणारे हिंदू बांधवांच्या सह्या आहेत.

## माजलगावात डॉ.आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त माजलगावात सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यानिमित्त दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ वाजता डॉ.आंबेडकर चौक येथे निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.या उत्सवात तमाम आंबेडकर प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ,श्रीहरी मोरे,नवनाथ धायजे,सुरेंद्र रेदासनी,रियाज काझी,बाळू ताकट यांच्यासह सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे हे १३५ वे वर्ष आहे.या निमित्ताने माजलगाव शहरात सामाजिक एकतेचा संदेश देण्याच्या उद्देशाने सर्व जात,धर्मीय बांधवांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या निमित्त शहरातील डॉ.आंबेडकर चौक,येथे सकाळी ९.४५



वा.निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते पार पाडणार आहे.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान आ.प्रकाश सोळंके भूषवणार आहेत.प्रमुख उपस्थितीत रमेशराव आडसकर,मोहनराव जगताप,दयानंद स्वामी,सहाल चाऊस,कचरु खळगे,विजय साळवे राजेश साळवे असणार आहेत.त्यामुळे सामाजिक समता वृद्धिगत करण्यासाठी दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९.४५ वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ,उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी,राजेंद्र होके पाटील,बाळु ताकट,मुजम्मील पटेल,सचिव एकनाथ मस्के,सहसचिव शरद यादव, कोषाध्यक्ष श्रीहरी मोरे,कमिटी सदस्य:सुशील डक, शेख बाबा,रियाज काझी,राजेश घोडे,लक्ष्मण गायकवाड,सल्लागार:डॉ.सुरेश साबळे,नाना घोडके,सुनील सौंदरमल,डॉ.ज्ञानेश्वर गिलबीले,डॉ. दिनकर मस्के,डॉ.श्रेयश देशपांडे,उमेश मोगरेकर,तुकाराम येवले,पद्माकर कांबळे,सुभाष नागलगावकर हरिष यादव,तालेब चाऊस,प्रभाकर साळेगावकर,दत्ता कांबळे,इद्रीस पाशा यांनी केले आहे.या बैठकीला व्यापारी व मराठा मुस्लिम दलित ओबीसी समाजातील प्रमुख उपस्थित होते.

## वडवणीमध्ये प्रभू श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

### हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**५० वर्षे किर्तनसेवेचे पूर्ण** : शहरातील ह.भ.प.माऊली महाराज बेदरकर यांच्या वारकरी सांप्रदायातील कीर्तन सेवेला यंदा ५० वर्षे पूर्ण झाले. श्रीराम मंदिर देवस्थानच्या वतीने वारकरी सांप्रदायाची आयुष्यभर सेवा करणार्या ह.भ.प.माऊली महाराजांचा हृदय सत्कार करण्यात आला.

वडवणी। प्रतिनिधी

शहराचे श्रद्धास्थान असणार्या वडवणी येथील श्रीराम मंदिरामध्ये आज श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळपासूनच भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. हजारो भाविकांनी दर्शन घेतले. यावेळी आयोजित विदर्भातील ह.भ.प. सोपान महाराज कन्हेरकर यांच्या किर्तनासाठी प्रचंड गर्दी झाली होती., महाप्रसाद आणि पालखी मिरवणुकीने जन्मोत्सवाची सांगता झाली.

वडवणी येथे श्रीराम जन्मोत्सव प्रचंड उत्साहामध्ये साजरा झाला. श्रीराम मंदिरात पहाटे अभिषेक करण्यात आला. सकाळपासूनच शहरातील भाविकांची दर्शनासाठी मंदिरामध्ये मोठी गर्दी होती. अकरा वाजता मंदिराच्या प्रांगणामध्ये विदर्भातील ह.भ.प.सोपान महाराज कन्हेरकर यांच्या किर्तनाला सुरूवात झाली. भर उन्हातही हजारो भाविकांनी किर्तनाचा लाभ घेतला. किर्तनाच्या शेवटी अनेक तरूणांनी व्यसनमुक्तीचा निर्णय घेतला. गुलालाची उधळण करत जन्मोत्सव साजरा झाला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. महाआरतीनंतर शहरातून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. टाळ मृदंगाच्या गजरामध्ये पालखी मिरवणुकीने जन्मोत्सवाची सांगता झाली.



## सिद्धेश्वर विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक आदिनाथ शास्त्री कुंडकर

माजलगाव । प्रतिनिधी

सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात माजलगाव येथील ह.भ.प. आदिनाथ शास्त्री कुंडकर त्यांनी १ऑगस्ट २००० पासून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई येथील शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून नियुक्ती मिळाल्या पासून कीर्तनसेवेचे मानधन घेतले नाही. एखाद्या ठिकाणी आग्रह करून दिलेच तर त्या कीर्तनरूपी सेवेच्या मानधनाचा विनियोग ते चांगल्या सामाजिक कार्यासाठी करत असतात.कधीच मानधन ठरवून कीर्तनसेवेसाठी ते जात नाहीत.परिसरात अनेक त्यांचे कीर्तनाचे कार्यक्रम असतात.गोदाकाठ तीर्थक्षेत्र गौतम ऋषि,संत बुवाजी बुवा महाराज रोषणपुरी,केदारेश्वर संस्थान देवखेडा,पंचमुखी हनुमान मंदीर बायपास रोड माजलगाव,सिंधफणा तट दक्षिणमुखी हनुमान मंदिर माजलगाव, मंगलनाथ मंदीर माजलगाव, तीर्थक्षेत्र शुक्लतीर्थ लिंबगाव,आणि माजलगाव



व माजलगाव परिसरातील गावे या ठिकाणी त्यांचे निःशुल्क, मानधन न घेता कीर्तनाचे कार्यक्रम असतात.

माजलगाव परिसरातील जिज्ञासु,ज्ञानपिपासु साधक त्यांच्याकडे पाणिनि व्याकरण, श्रीमद्भागवत ग्रन्थाचे अध्ययन, कीर्तनाचे शास्त्र शुध्द मार्गदर्शन घेण्यासाठी नेहमीच येत असतात. ते त्या साधकांकडून कोणत्याच मानधनाची अपेक्षा न करता त्यांना निःशुल्क ज्ञानदान करत असतात. आपल्या स्वकर्तव्या मध्येही ते दक्ष असतात. सन २०२४ -२५मध्ये त्यांनी इयत्ता ८वी अ मधील विद्यार्थ्यांचे संपूर्ण संस्कृत व्याकरण पाठांतर करून घेतले. त्यांनी कु.अक्षरा संतोष गवारे, ढालकरी प्रणाली प्रवीण, सरवदे प्रतिक्षा सतीश, गवते श्रावणी कल्याण, भागवत अमृता सचिन, ढेरे अनुष्का गणेश, फुलझळके निलय रामकृष्ण , जोशी विशाल वसंतराव , थेटे नैतिक अशोक , राऊत आदर्श विकास , डाके प्रतिक विठ्ठल , मोरे यशवंत उद्धव इयत्ता १०क महाजन आरती महादेव या बक्षीस पात्र प्रत्येक विद्यार्थ्यांना एक रजिस्टर,फुलपट्टी,पेन,खोडरबर,

प्रत्येकी ८५ रुपयाचे शैक्षणिक साहित्य वाटप केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी केले. त्यांनी गत दोन दशकांपासून श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात इयत्ता ७ वी मधून ८ वी मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक एप्रिल ते १में असा वासंतिक संस्कृत संभाषण वर्ग प्रारंभ केलेला आहे.या वर्गासाठी येथील संपूर्ण संस्कृत विभाग कार्यरत असतो.त्यात आदिनाथ कुंडकर, प्रभाकर बनसोडे,व विजय सोन्नर. हा उपक्रम २०२५-२६या शैक्षणिक वर्षांपासून संपूर्ण भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत राबविण्यात येणार आहे. जिल्हा संत संपर्क प्रमुख म्हणून संघाचे दायित्व पण त्यांच्या कडे आहे.आदिनाथ शास्त्री कुंडकर यांना भारतीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, स्थानिक कार्यवाह अड विश्वास जोशी. शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, , उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर , पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांच्या शैक्षणिक कार्यास हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.

## एसटी महामंडळातले सुरेश सोनबा देवकते सेवा निवृत्त



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील आगार मध्ये पंचवीस वर्षांपासून इमानेइतबारे काम करणारे सुरेश सोनबा देवकते हे दि.५/४/२०२४ शनिवार रोजी सेवानिवृत्त झाले त्यांचे पाटोदा आगाराच्या वतीने सत्कार करुन निरोप देण्यात आले.

देवकते यांनी गेल्या पंचवीस वर्ष अगोदर रुजू झाल्यानंतर इमानेइतबारे चालक म्हणून काम केले यावेळी त्यांच्या सत्कार करुन निरोप देताना त्यांच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या कामाला उजाळा देत कौतुक करण्यात आले. त्यांच्या निरोप समारंभ देण्यासाठी. त्यांची पत्नी त्यांचे मुले त्यांचे नातू व आप्तेष्ट नातेवाईक इतर उपस्थित होते.चार पाचशे लोक उपस्थित होते. आगार प्रमुख श्री खेडकर साहेब व शेख जहीर भाई सह ग्रामस्थ सर्व. सर्वांनी भावनिक होऊन त्यांना निरोप देण्यात आला.

# राक्षसभुवन भाविकांच्या स्वागतासाठी होतंय सज्ज नारायणगडच्या नारळी सप्ताहाची जय्यत तयारी

**शिरूर । शंकर भालेकर**

**धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडाचा ७३ वा फिरतानारळी सप्ताह यावर्षी शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसभुवन थांबा येथे आयोजित करण्यात आला असून या भव्य दिव्य सोहळ्याची ग्रामस्थांकडून जय्यत तयारी चालली असून दोन दिवसावर आलेल्या या सप्ताह सोहळ्याच्या निमित्ताने राक्षसभुवननगरीमध्ये येणाऱ्या संत –महंत,भाविक –भक्तांच्या स्वागतासाठी सज्ज होताना दिसत आहेत.**

महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान, धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री.क्षेत्र नारायणगडाचा नावलौकिक दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तत्कालीन श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती वै.गुरुवर्य महंत महादेव महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू करण्यात आलेला गडाचा फिरत्या नारळी सप्ताह बीड जिल्ह्यातील भाविक भक्तांसाठी भव्य महोत्सव झाला आहे. वै. महादेव महाराज यांनी फिरत्या नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी परंपरा, समाजात पसरलेली अंधश्रद्धा, अज्ञान, दूर करून समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठी सप्ताहाचे आयोजन केले होते. या सप्ताहातच्या माध्यमातून संत विचाराचे मंथन होऊन समाज प्रबोधन, जनजागृती होईल आणि भरकटलेला समाज उन्नतीच्या दिशेने मार्गक्रमण करेल या उद्देशाने फिरत्या नारळी सप्ताहाचे रोपटे लावण्यात आले होते. आज या रोपट्याचे वटवृक्षांमध्ये रूपांतर होऊन अध्यात्माच्या पटलावर मोठा नावलौकिक झाला आहे. वै. महादेव महाराज यांच्या वैकुंठगमना उत्तराधिकारी म्हणून विद्यमान मठाधिपती



हभप. महंत शिवाजी महाराज यांनी गुरु देवाने घालून दिलेल्या परंपरेला मोठ्या अट्टहासाने खतपाणी घालून सप्ताहाची व्यापकता वाढवली आहे. श्री.क्षेत्र नारायणगडाचा ७३ व्या फिरत्या नारळी सप्ताहाच्या आयोजनाचे नारळ शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसभुवन (तांबा) येथील ग्रामस्थांनी उचललेले असून गुरुवार दि.१० एप्रिल पासून आरंभीत होणाऱ्या या सप्ताह सोहळ्याची राक्षसभुवन ग्रामस्थांच्या वतीने जय्यत तयारी चालू आहे. गेल्या वर्षभरापासून आज सप्ताह मोठ्या थाटात पार पडावा आणि आपल्या गावाचा नावलौकिक दूरवर जावा यासाठी सप्ताहाच्या पूर्वतयारीचे नियोजन चालू होते. या सप्ताहाच्या निमित्ताने राक्षसभुवन येथे येणाऱ्या मान्यवर संत–महंत, कथाकार, कीर्तनकार, संगीतकार,सामाजिक, राजकीय,शैक्षणिक आदींसह विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांसह भाविक–भक्तांच्या भक्तांच्या सुख सोयी,स्वागतासाठी राक्षसभुवनकर सज्ज झाले आहेत. नियोजित सप्ताह स्थळांवर भाविक

### भाविकांच्या स्वागतासाठी शोभायात्रेचे आयोजन

सप्ताहाच्या पुष्पवृष्टीसाठी गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज, उत्तराधिकारी संभाजी महाराज आदींसह महाराष्ट्र भरातुन मान्यवर संत–महंत उपस्थिती लावणार आहेत. या मान्यवरांच्या स्वागतासाठी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे यामध्ये विविध वाद्यांच्या पथकासह सांस्कृतिक देखावा सादरीकरणाचे पथके निमंत्रित करण्यात आले आहे.

### हेलिकॉप्टर मधून होणार पुष्पवृष्टी

श्री.क्षेत्र नारायण गडाची मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्यासह संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना राक्षसभुवन मध्ये आणण्यासाठी हेलिकॉप्टर प्रवासाचे नियोजन करण्यात आले आहे. श्री.क्षेत्र नारायण गड ते राक्षस भुवन असा या हेलिकॉप्टरचा प्रवास होणार असून दहाच्या मंडपावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात येणार सांगितले जात आहे.

# ...तर तहानलेल्या नागरिकांसाठी रस्त्यावरील संघर्षाची तयारी – राजेभाऊ फड

परळी । प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढली असून, एप्रिल महिना असल्याने सूर्य आग ओकत आहे. अशातच पाण्याची मोठी टंचाई जाणवू लागली आहे. त्याचबरोबर पशुपक्षी आणि जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे काहीसा दिलासा मिळेल अशी अपेक्षा असल्याने पाणी नदीपात्रात सोडावे ही मागणी गेल्या महिनाभरापासून करण्यात येत आहे. त्यासंदर्भात निवेदने देऊन आणि पत्रव्यवहार करून प्रशासनाला कळवले आहे. येत्या १० तारखेपर्यंत पाणी



### कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी सोडण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट; पाणी सोडण्याचे दिले आश्वासन

सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी गावात तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याच विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेतली.

# उद्योग उभारणीसाठी मुलभूत तत्वांचा वापर करावा –दांडगे



जालना । प्रतिनिधी

मिटकॉन प्रशिक्षण केंद्र व उद्योजकता विकास विभाग यांच्या वतीने जालना येथे आज दि.०७ एप्रिल २०२५ रोजी एक दिवशीय व्यावसायिक कार्यशाळा घेण्यात आली..यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, यांचें मार्गदर्शन लाभले सोबत शेख शरीफ व प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती.या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की युवकांनी उद्योग उभारणीसाठी मुलभूत तत्वांचा वापर केला पाहिजे,उद्योगाची मुलतत्वो शोधल्यास अपयश मिळत नाही तर यशाचे शिखर गाठता येते. या प्रशिक्षणात उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग

# झालेत गुलाम मोकळे; भिमा तुझ्या जन्मामुळे

## जयभिम महोत्सवात महापुरुष वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये जयभिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४३ व्या जयंती निमित्ताने बीडमध्ये ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित केला आहे. सोमवारी या महोत्सवात महापुरुष वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेला अध्यक्ष डी.जी.वानखेडे तर प्रमुख पाहुणे म्हणून गुलाब भोले



### आज होणार असे कार्यक्रम

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मंगळवार (दि.८) रोजी सकाळी ११ ते ५ महिलांचे विविध कार्यक्रम तर सायंकाळी ६ वाजता डॉ.राजेंद्र गोणारकर यांचे व्याख्यान होणार आहे.

सर, डी.एम.राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. जयभिम महोत्सवाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळाली.यातून त्यांच्या ज्ञानातही भर पडली.त्यआमुळे एक चांगला समाज निर्माण होण्यास ही अतिशय पोषक ठरली आहे.महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे परीक्षण ॲड.नितीन वाघमारे,प्रणित सरवदे यांनी केले.महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे प्रास्ताविक

# डॉ.संजय राऊत आणि डॉ. सदाशिव राऊत यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

सोमवारी बीड जिल्हा रुग्णालयात महात्मा फुले युवा दलाच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सकपदी नुकतीच नियुक्ती झालेल्या डॉ. संजय राऊत आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकपदी नियुक्त झालेल्या डॉ. सदाशिव राऊत यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा सरपंच राजेंद्र अण्णा राऊत, महात्मा फुले युवा दल पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, डॉ. अक्षय भोपळे, रमेशभाऊ दुधाळ, सतीश कातखडे, युवा नेते दीपक भुजबळ, फैयाज पठाण, अमोल खिंवसरा आदी उपस्थित होते.

# रामजी की निकली सवारी, रामजी की लिला है न्यारी

## श्रीराम जन्मोत्सवा निमित्त मिरवणुक उत्साहात, हजारो रामभक्त युवकांचा सहभाग, श्रीरामाच्या भव्य मुर्तीचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई शहरात रामजन्मोत्सव निमित्याने भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली मिरवणुकीत हजारो रामभक्त युवकांचा सहभाग होता या निमित्ताने शहरात भगवे ध्वज,पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती.**



रामभक्तांच्या वतीने शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली पाटील चौक भागातील राममंदीर येथून या मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील विविध महत्वपुर्ण चौक,मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या मिरवणूकीने मार्गक्रमण केले. यावेळी भव्य अशा श्रीरामांच्या भव्य आकर्षक मुर्तीचे भक्तांनी दर्शन घेतले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मिरवणुकीने शहरातील वातावरण भक्तीमय

अंबाजोगाईत राम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पारंपारीक राम मंदिरात जन्मोत्सव तसेच पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला या निमित्याने शहराच्या धार्मिक वैभवात भर पडली तसेच वातावरण भक्तीमय झाले विशेष म्हणजे शहरातून निघालेली भव्य मिरवणूक शहराचे प्रमुख आकर्षण होती, प्रभु रामचंद्रांच्या मुर्तीचे विधिवत पुजन करून या मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला. गेल्या काही वर्षापासुन होत असलेल्या या मिरवणूकीने अंबाजोगाईच्या धार्मिक तसेच सांस्कृतिक वैभवात भर घातली शहराला धार्मिक वारसा असून मिरवणूकीच्या निमित्ताने यात अधिक भर घातली गेली आहे.

भगवे ध्वज ठरले आकर्षण

कोरोना संकटामुळे युवकांना सर्व सण, उत्सव साजरे करता आले नाहीत संकट नाहिसे झाल्यानंतर श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असता यात हजारो युवक भगवे ध्वज घेवून मिरवणूकीत समुहाने सामील झाले होते.हे युवक अधिक आकर्षण ठरले. विविध रामगीतांच्या गाण्यावर अभिनय आणि नृत्य करून आपल्या हातातील ध्वज हवेत उंचवून नागरिकांचे लक्ष वेधत होते. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणच्या रस्त्यावर रांगोळ्या काढून भगव्या पताका, ध्वज, फलक, लावुन मिरवणुकीचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# अंबाजोगाई भक्तनिवास न्यास पुणेच्या वतीने साडेपाच लाख रुपयांची अत्यावश्यक साहित्य उपकरणे भेट



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या फिजिओथेरपी व अक्युपेशनल थेरपी विभागासाठी श्री अंबेजोगाई भक्तनिवास न्यास पुणे च्या वतीने रक्कम रुपये साडेपाच लाख रुपयांची अत्यावश्यक साहित्य उपकरणे देणगी स्वरूपात देण्यात आली. आजपर्यंत अशा प्रकारची अद्ययावत उपकरणे प्रथमच रुग्णालयास मिळाली आहेत. यामुळे सुमारे ७० ते ८० रुग्णांना याचा लाभ रोज होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे , डॉ.बिराजदार , डॉ.लामतुरे तसेच श्री अंबेजोगाई भक्तनिवास न्यासाचे विश्वस्त रमेश भागवत , संजय जोशी व ऋषिकेश साने आणि ससून रुग्णालय पुणेचे समाजसेवा अधीक्षक डॉ.शंकर मुगावे व जगन्नाथ लडकत उपस्थित होते.

# धार्मिक संस्कार नसतील तर शिक्षण व्यर्थ

## भगवान गडाचे ह.भ.प. आशिष महाराज बडे शास्त्री; धर्मापुरी येथे अखंड हरिनाम सप्ताह थाटात प्रारंभ

परळी / प्रतिनिधी

भारतीय संस्कृतीत साधुसंतांनी सप्ताह, उत्सव सोहळे सुरू केले. त्यामागे धार्मिक कारण होते. धार्मिकतेतून जीवन कसे जगावे याचा उपदेश केला जात होता. संतती संस्कारी व्हावी, त्यांना धर्म कळावा हा यामागचा उद्देश होता. पण हल्लीच्या काळात डॉक्टर–इंजिनियर झालेली मुले परदेशात जाऊन आई–वडिलांना विसरतात व त्यांच्या अंत्यसंस्काराचा विधी व्हिडिओ कॉलवरून उरकतात. म्हणून अध्यात्माचे संस्कार नसतील तर अशा उच्च शिक्षणाचा उपयोग काय? असा मौलिक उपदेश भगवान गडाचे हभप आशिष महाराज बडे शास्त्री यांनी केला.

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे श्री रोकडेश्वर जागृत देवस्थान मंदिराचा जीर्णोद्धार समस्त ग्रामस्थांनी लोकसहभागातून केला आहे. यानिमित्त श्रीराम नवमी दिनी अखंड हरिनाम सप्ताह



व हनुमान–शिव महापुराण कथा सुरू करण्यात आली आहे. या सप्ताहाची सुरुवात मोठ्या थाटामाटात झाली आहे, असे सांगून आशिष महाराज म्हणाले, चराचरामध्ये ईश्वर सामावलेला आहे. ज्यावेळी अशी भावना तयार होईल की चराचरात ईश्वर आहे त्यावेळी प्रत्येक माणसाच्या अंतर्मनात द्वेष राहणार नाही. आज आपण शुक न पाहणाऱ्या जनसमुदायात राहतो. अशा काळात धर्मापुरी येथील युवा पिढी व ग्रामस्थांनी श्री रोकडेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार केला आणि या मंदिराचा उत्सव श्रीराम नवमी निमित्त आरंभीला हा मोठा स्तुत्य उपक्रम आहे. भगवंताला भक्तप्रिय असतात. हनुमान तर सर्वश्रेष्ठ भक्त आहे. म्हणूनच प्रभू श्रीरामापेक्षा हनुमानाची मंदिरे अधिक आहेत. साधुसंतांनी सप्ताह ठेवले. कारण संतती संस्कारी व्हावी, त्यांना धर्म कळावा, धार्मिक तेथून जीवनाचा अर्थ काढावा, आई–वडिलांचे महात्मे कळावे म्हणून अध्यात्म आवश्यक आहे. अध्यात्माचे संस्कार नसतील तर शिक्षणाचा काहीही उपयोग नाही. कारण हल्लीच्या काळात मुलगा अमेरिकेत व इतर देशात स्थायिक झाला आणि इकडे आई–वडिलांच्या अंत्यसंस्काराला तो येऊ शकत नाही. अंत्यसंस्काराचे व्हिडिओ कॉल करून विधी उरकतो, असे सांगताना आशिष महाराज बडे यांनी डॉक्टर, इंजिनिअर, उच्चपदस्थ अधिकारी झाला पण संस्कारी नाही तर काय उपयोग? त्यासाठी अध्यात्माचे संस्कार आवश्यक आहेत, असा उपदेश केला. अध्यात्माच्या संस्काराचे महात्मे आशिष महाराजांनी महाभारतातील रणांगण भूमीत श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेल्या ''कर्माचे सार'' याद्वारे स्पष्ट करून सांगितले.

# कडा येथे शिवशंभो प्लंबिंग ॲण्ड हार्डवेअर दालनाचे आई वडिलांच्या हस्ते झाले उद्घाटन

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील नगर–बीड रोडवरील चंद्रमा शोरुम शेजारी शिवशंभो प्लंबिंग ॲण्ड हार्डवेअर नवीन व्यवसायांचे उद्घाटन वडील

आसाराम घोडके,आई कुसुम घोडके या आईवडिलांच्या हस्ते रविवार दि ६ एप्रिल रोजी करण्यात आले यावेळी सरपंच राधेश्याम भैय्या धस,मा जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे , सरपंच संदीप खकाळ,अनिल ढोबळे,अशोक तात्या घोडके, ज्ञानेश्वर चौधरी, सरपंच अशोक पवार ,विजय गाढवे, सरपंच अजित घुले, जेष्ठ पत्रकार विनोद ढोबळे,पत्रकार अविनाश कदम,अंकुश तळेकर, सय्यद बबलू ,नितीन कांबळे, संजय खंडागळे, मारूती संत्रे,सागर ढोबळे, राजूशेठ चौधरी,सतीश



चौधरी, किरण सोनवणे, बाळासाहेब झांबरे, विजय शेळके,श्रीराम गोंडकर, सुभाष भादवे,बाळासाहेब शेंदूरकर, रामेश्वर सुंबे, सतीश सायंबर, अशोक धायगुडे.मधुकर सायंबर अमोल सायंबर, प्रा.नरसाळे सर,प्रा.भवर सर थोरवे सरपंच, अभय गर्जे, विशाल झांबरे, शरद कर्दुळे ,विजय कर्डीले,साबळे दाजी,शरद सायंबर,कृष्णा काकडे, सतिश सातपुते,सुनील कुलकुर्णी, राहुल सुरवसे, पोपट शेकडे सरपंच देवळाली गलांडे चेअरमन बाळासाहेब जगताप, बंडू तळेकर,अण्णासाहेब घोडके,रेवन्नाथ जाधव, बबन काळे,के के काकडे,आदिनाथ पडोळे,वसीम शेख,गणेश पोकळे,अनिल काळे,ज्ञानेश्वर गव्हाणे, दिलीप भवर, ढोबळे सर,दत्ता घोडके,नामदेव सायंबर, राजेंद्र सायंबर, समाधान आंधळे, तात्या

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रूत घैसासांचा राजीनामा, चौकशीचा अहवाल येताच मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील प्रख्यात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर डॉ. सुश्रुत घैसास यांनी आपला पदाचा राजीनामा दिला आहे. रुग्णालय प्रशासनाच्या प्रतिमेला सुरुंग लागणाऱ्या घटनांमुळे आणि रुग्णांची होणारी गैरसोय पाहता त्यांनी स्वेच्छेने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. तनिषा भिसे या रुग्णाच्या उपचारासंदर्भात झालेल्या वादानंतरच ही घटना घडल्याने, या प्रकरणाला अधिक गती मिळाली आहे. डॉ. घैसास यांनी रुग्णालय प्रशासनाला अधिकृतरित्या राजीनामा सुपूर्त केला असून, या राजीनाम्याची माहिती समोर येताच वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. तनिषा भिसे या अल्पवयीन रुग्णाच्या उपचारासाठी डॉ. घैसास यांनी अमानत रक्कम (वर्शीळीं) भरावी लागेल, अशी अट घातल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता. या आरोपानंतर सोशल मीडियावर रुग्णालयाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. अनेकांनी अशा वर्तणुकीचा निषेध करत रुग्णालय व्यवस्थापनाकडून कारवाईची मागणी केली.




डॉ. घैसास हे रुग्णालयातील अत्यंत अनुभवी आणि कुशल डॉक्टर म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या विरोधात झालेल्या आरोपांमुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवर निर्माण झालेला ताण आणि रुग्णालयाच्या प्रतिमेला झालेली हानी लक्षात घेता त्यांनी पदाचा राजीनामा देणे पसंत केले. राजीनाम्याच्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, या संपूर्ण प्रकरणामुळे रुग्णालयाच्या नावलौकिकावर गालबोट लागत असून, माझ्या उपस्थितीमुळे परिस्थिती अधिक बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी स्वेच्छेने राजीनामा देत आहे. रुग्णसेवा हे माझे सर्वोच्च कर्तव्य असून, त्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, हीच माझी भूमिका आहे.

दरम्यान, रुग्णालय प्रशासनाने या प्रकरणाची अंतर्गत चौकशी सुरू केली असून, तनिषा भिसे प्रकरणातील सत्य काय आहे, हे लवकरच स्पष्ट होईल, असे सांगण्यात येत आहे. या प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रातील नीतिमूल्ये, जबाबदारी आणि रुग्णांच्या हक्कांबाबत पुन्हा एकदा चर्चेला उधाण आले आहे. रुग्णाच्या कुटुंबीयांनी आता न्याय मिळावा, दोषींवर कारवाई व्हावी आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी रुग्णालय प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. दरम्यान, डॉ. घैसास यांचे समर्थक आणि काही रुग्णही सोशल मीडियावर त्यांच्या समर्थनार्थ व्यक्त होत असून, त्यांनी आतापर्यंत दिलेल्या वैद्यकीय सेवांचा उल्लेख करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपशील पुढील काही दिवसांत स्पष्ट होण्याची शक्यता असून, वैद्यकीय प्रशासन आणि रुग्णालय यांच्यासमोरील आव्हाने आता अधिक गुंतागुंतीची झाली आहेत.

# संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे १९ जूनला होणार प्रस्थान

**आळंदी । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पायी वारी पालखी सोहळा १९ जुन रोजी आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. ५ जुलै रोजी माऊलींची पालखी पंढरपुरात दाखल होणार आहे. पंढरपूर येथे पार पडलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंडी समाज बैठकीत वारीतील विसावा, मुक्काम व इतर नियोजनावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. अद्याप अधिकृत वेळापत्रक ठरले नसून लवकरच संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात येईल असे देवस्थान तर्फे सांगण्यात आले आहे. यंदा पालखी सोहळा वेळापत्रक तिथीक्षय होत असल्याने लोणंद येथे अडीच दिवस मुक्काम घ्यावा अशी चर्चा दिंडी सामाजिक बैठकीत झाली. मात्र, यावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, बाळासाहेब चोपदार, रामभाऊ चोपदार, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, आळंदी देवस्थानचे प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नामदेव वासकर, विठ्ठल वासकर, मारुती कोकाटे, भाऊ महाराज फुरसुंगीकर, चैतन्य महाराज कबीर, आबा धाडगे, एकनाथ हांडे आदी उपस्थित होते.

पालखी प्रस्थान सोहळा १९ जून रोजी अलंकापुरीमध्ये पार पडणार आहे. आळंदी आजोळ घर गांधी वाड्यातून पालखी २० जून रोजी पंढरपुरकडे मार्गस्थ होईल. ५ जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पंढरपूर मध्ये पोहचेल. ६ जुलै रोजी देवशयनी आषाढी एकादशी सोहळा पंढरपुर मध्ये पार पडणार आहे.



काही मुक्काम, विसावे बदलण्याची शक्यता

एक तिथी तिथीक्षय होत असल्याने काही ठिकाणी मुक्काम वाढत असून एका ठिकाणचा मुक्काम रद्द करण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर गेल्या चार वर्षात काही नवीन विसावे ठरले होते ते देखील यंदाच्या सोहळ्यात बदलण्यात येण्याची शक्यता आहे. त्यावर समाज बैठकीत एकमत न झाल्याने अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले नसल्याचे समजते.

# वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडीचे सुलभीकरण शक्य - माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडीच्या पध्दतीत सुलभीकरण करणे शक्य आहे. एकाच वेळेस वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी ठराविक मुदतीत दिल्यास अडचणीच दूर होतील, असे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी स्पष्ट केले आहे.



शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती केल्यानंतर संस्थेने केलेली नियुक्ती नियमानुसार केलेली आहे किंवा नाही हे तपासून वैयक्तिक मान्यता दिली जाते. प्राथमिक शिक्षकांना वैयक्तिक मान्यता प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षकांना वैयक्तिक मान्यता

माध्यमिक शिक्षणाधिकारी देतात तर उच्च माध्यमिक शिक्षकांना वैयक्तिक मान्यता विभागीय शिक्षण उपसंचालक देतात. पूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी वैयक्तिक मान्यता दिल्यानंतर वरिष्ठ अधिकारी कार्यालयीन तपासणीच्या वेळी दहा टक्के वैयक्तिक मान्यतांची प्रकरणे तपासणी करायचे त्यामुळे कार्यालयास एक प्रकारची शिस्त होती वरिष्ठ कार्यालयाच्या तपासणीमध्ये त्रुटी येऊ नये म्हणून वैयक्तिक मान्यता देताना खूप दक्षता व काळजी घेतली जात होती.

वैयक्तिक मान्यता दिल्यानंतर संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यतेचा आदेश न देता वैयक्तिक मान्यतेची संचिका दर आठ दिवसांनी सध्या शालार्थ आयडी देण्याचे अधिकार आहेत त्या अधिकाऱ्यांकडे पाठवायच्या. त्यांनी दिलेली मान्यता योग्य आहे किंवा नाही हे तपासून पंधरा दिवसात वैयक्तिक मान्यता देणारे अधिकाऱ्यांना कळवायचे. दिलेली वैयक्तिक मान्यता नियमानुसार असेल तर शालार्थ आयडी द्यायचा. त्रुटी असेल तर त्रुटी बाबत कळवायचे. त्यांनी शालार्थ आयडी दिल्यानंतर ज्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता दिलेलली आहे त्यांना वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी एकाच वेळेस द्यायचा. एकदा वैयक्तिक मान्यतेसाठी व शालार्थ आयडीसाठी अशी दोन वेळा संचिका सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही, असे मतही टेमकर यांनी व्यक्त केले आहे. वैयक्तिक मान्यता देणारे अधिकारी व शालार्थ आयडी देणारे अधिकारी अशा दोघांची समिती स्थापन करावयाची. वैयक्तिक मान्यतासाठी आलेली संचिका बाबत दोघांनी दर आठवड्यातील एका ठराविक दिवशी एकत्रित बसून वैयक्तिक मान्यता व शालार्थ आयडी देण्याबाबत एकदाच निर्णय घ्यायचा. तो निर्णय संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कळवायचा. ही पध्दतही अवलंबता येणार असल्याचा पर्याय टेमकर यांनी सुचविला आहे.

# शेअर ट्रेडिंगच्या बहाण्याने फसवणूक करणारे रॅकेट उघडकीस; पुणे सायबर पोलिसांची मोठी कामगिरी, सहाजणांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीवर आकर्षक परताव्याच्या बहाण्याने ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी ६० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर पोलिसांनी सहा जणांना अटक केली. पुणे सायबर पोलिसांनी देशपातळीवरील फसवणुकीचे मोठे रॅकेट उघडकीस आणले असून, आरोपींचे दुबई, गुजरात आणि पश्चिम बंगाल कनेक्शन असल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ज्येष्ठ नागरिकाला व्हॉट्सॲप कॉलद्वारे अनन्या गुप्ता नावाच्या महिलेने संपर्क केला. तिने शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर भरघोस परतावा मिळेल, असे सांगून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये एक कोटी ६० लाख रुपये जमा करण्यास प्रवृत्त करून फसवणूक केली. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



तपासादरम्यान १७ मार्च रोजी वाघोलीतील एका बँकेच्या खात्यातून पाच लाख ८२ हजारांची रक्कम धनादेशाद्वारे काढल्याचे निष्पन्न झाले. यावरून खराडीतील केतन भिवरे याला पोलिसांनी ताब्यात घेतले. तांत्रिक तपासातून इतर आरोपींची नावे समोर आली. गोविंद सूर्यवंशी (रा. वाघोली, मूळ रा. हिंगोली), रोहित कंबोज (रा. वाघोली, मूळ रा. पंजाब), ओंकार भवर (रा. वाघोली, मूळ रा. हिंगोली), जब्बरसिंह पुरोहित (रा. चऱ्होली, मूळ रा. धारावी), निखिल ऊर्फ किशोर सातव (रा. वाघोली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. न्यायालयाने आरोपींना १२ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

यातील सूर्यवंशी आणि कंबोज बी.टेक पदवीधर असून, डिजिटल मार्केटिंग आणि क्रिप्टोकरन्सी व्यवहारात सक्रिय आहेत. सूर्यवंशी हा वाघोलीतील विघ्नेश्वर मल्टीस्टेट को.ऑप बँकेचा संचालक आहे. कंबोज बँकेतील तांत्रिक कामे बघत होता. सातव हा बनावट बँक खाती पुरवठा करीत होता. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त विवेक मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे, पोलिस उपनिरीक्षक संदीप कदम, तुषार भोसले, संदीप पवार, दिनेश मरकड आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या टोळीने दीडशे बँक खाती वापरून सायबर गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. नॅशनल सायबर पोर्टलवर विविध राज्यांत २९ तक्रारी दाखल असून, त्यात या टोळीचा हात असल्याचे सायबर पोलिसांनी उघड केले आहे.

# पॅट परीक्षेचा इयत्ता नववीचा पेपर फुटला; २ युट्यूब चॅनलवर एफआयआर दाखल होणार

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) वतीने घेण्यात येत असलेल्या संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षेचा (पॅट) इयत्ता नववीचा मराठी विषयाचा पेपर फुटल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. याप्रकरणी दोन यू ट्यूब चॅनलवर एफआयआर दाखल करण्यात येणार आहे.

स्टार प्रकल्पांतर्गत मराठी, इंग्रजी आणि गणित विषयांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी परीक्षा घेण्यात येते. सरकारी, खासगी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांच्या तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ८ ते २५ एप्रिल या कालावधीत परीक्षा होत आहे. पॅट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका एससीईआरटीकडून शाळांना पुरविण्यात येतात. या परीक्षांसाठी कोट्यावधी रुपयांचा खर्चही करण्यात येतो.




इयत्ता नववीचा मराठी प्रथम भाषा या विषयाची परीक्षा मंगळवारी (दि. ८ एप्रिल) होणार असल्याचे वेळापत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यापूर्वीच काही यू ट्यूब चॅनलवर पॅटची प्रश्नपत्रिका कशी सोडवावी, या संदर्भातील व्हिडिओ उपलब्ध झाले आहे. दोन दिवसांपूर्वीच हा व्हिडिओ प्रसिद्ध करण्यात आला. मराठी विषयाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर काय आहे, उत्तर कसे लिहावे, अशी सर्व माहिती व्हिडिओमध्ये देण्यात आली आहे. त्यामुळे पेपर फुटल्याची बाब समोर आली. याप्रकरणी एससीईआरटीच्या वतीने दोन यू ट्यूब चॅनलवर एफआयआर दाखल करून हे चॅनल बंद करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस विभागाच्या सहकार्याने प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येणार आहे, अशी माहिती एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांनी दिली आहे. दरम्यान, परिक्षा रद्द करणं शक्य नसल्याचे रेखावार यांनी रात्री उशीरा स्पष्ट केले. यामुळे परीक्षा होणार असल्याचे सांगितले.

# ‘एचएसआरपी’च्या नावाखाली फसवणूक

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्यातील वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) अनिवार्य करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी केली जात आहे. एचएसआरपी नसलेल्या वाहनचालकांकडून थेट दहा हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद आहे. त्यामुळे अनेक नागरिक या प्लेटसाठी नोंदणी करण्याचा प्रयत्न करत आहेत. याचा गैरफायदा घेत सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीचे सत्र सुरू केले आहे.

पिंपरी-चिंचवडसह पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, कोल्हापूर आणि अन्य शहरांतील नागरिक एचएसआरपी नंबर प्लेटच्या नावाखाली आर्थिक फसवणुकीचे बळी ठरत आहेत. काही ग्रामीण भागांतूनही तक्रारी देखील समोर येत आहेत. पिंपरी-चिंचवड सायबर पोलिस ठाण्यात आतापर्यंत वीस नागरिकांची फसवणूक झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

# दत्तात्रेय गाडेची पोलिस कोठडी मिळण्यासाठी पोलिसांचे सत्र न्यायालयात अपील

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट बस स्थानकातील अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे याचा ताबा मिळवण्यासाठी आता पोलिसांनी सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. गाडे याच्या पोलिस कोठडीसाठी पुणे पोलिसांनी अपील केले असून मंगळवारी (ता.८) त्यावर सुनावणी होणार आहे.

गाडेची पोलिस कोठडी मिळावी यासाठी पोलिसांनी केलेला अर्ज न्यायालयाने दोनदा फेटाळला आहे. त्यामुळे आता पोलिसांनी याबाबत अपील केले आहे.

या गुन्ह्यात गाडेला २८ फेब्रुवारीला अटक केल्यानंतर त्याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. पोलिसांना १४ पैकी १२ दिवस आरोपीची कोठडी मिळाली होती. पण उर्वरित दोन दिवसांच्या पोलिस कोठडीचा हक्क अबाधित ठेवत पोलिसांनी त्यास न्यायालयीन कोठडी मिळावी, असा अर्ज यापूर्वी न्यायालयात दिला होता.

आता तपासात काही नवीन माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यानुसार आरोपीकडे चौकशी करण्यासाठी त्याचा ताबा मिळण्याकरिता त्यांनी दोनवेळा न्यायालयात अर्ज दाखल केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळून लावला होता.




आरोपीच्या वकिलांना गाडेला भेटायची परवानगी

आरोपीला हजर केल्यानंतर त्याच्याशी न्यायालय परिसरातच बोलण्यासाठी परवानगी देण्याची मागणी, त्याचे वकील ॲड. वाजेद खा-बिडकर यांनी केली होती. त्यानंतर आरोपीची कारागृहात रवानगी झाल्यावर कारागृहात जाऊन त्याची समोरासमोर मुलाखत घेण्यास परवानगी देण्याची मागणी त्यांनी केली. ड. बिडकर यांचा अर्ज न्यायालयाने मंजूर करत गाडेला भेटण्याची परवानगी दिली आहे.

# दिव्यांगांसाठी अर्थसंकल्पातील एक टक्का निधी राखीव; अजित पवार यांची माहिती

**बारामती । प्रतिनिधी**

दिव्यांगांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पातील १ टक्का निधी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली असून, आगामी काळात दिव्यांगांना सोयी-सुविधेकरिता लागणार्या निधीची कमतरता पडू देणार नाही. या माध्यमातून दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

बारामती पंचायत समिती येथे पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत तालुक्यातील दिव्यांगांना तीनचाकी इलेक्ट्रिक सायकल वाटप कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या वेळी गट विकास अधिकारी डॉ. अनिल बागल, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, अष्टावधानी संतुलन फाउंडेशनचे भाऊसाहेब-जंजिरे आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, दिव्यांग बांधव-भगिनी आज प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. दिव्यांगांना स्वावलंबनासाठी लागणारी संसाधने आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास ते



देखील समाजाच्या मुख्य प्रवाहात आपले योगदान देऊ शकतात. त्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पात सर्व जिल्ह्यांकरिता जिल्हा वार्षिक योजनेसाठी २२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी १ टक्का रक्कम दिव्यांगांकरिता खर्च करण्याचे या वर्षापासून बंधनकारक करण्यात आले आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने शिष्यवृत्ती सुरू करण्यासाठी, कृत्रिम अवयव, साधने विकत घेण्यासाठी आणि स्वयंरोजगार अर्थसहाय्य योजना राबविण्याकरिता प्रयत्न करण्यात येईल. राज्यातही केंद्राप्रमाणे दिव्यांगांना पदोन्नतीत आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिव्यांगाना अधिक सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने विधायक सूचना कराव्यात, असे आवाहन पवार यांनी केले.

दिव्यांग बांधवांना सुलभरीत्या दळणवळणाची सोय व्हावी, त्यांचे दैनंदिन जीवन सुखर करण्याकरिता अष्टावधानी संतुलन फाउंडेशनच्या वतीने १०० दिव्यांग नागरिकांना तीनचाकी इलेक्ट्रिक सायकलींचे वाटप करण्यात येत आहे. या माध्यमातून जंझिरे कुटुंबीय आपली सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग बांधवांना मदत करीत आहे, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. दिव्यांगांनी या सायकलीचा आपल्या व्यवसायात उपयोग करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करावा.

तालुक्यात विविध विकासकामे सुरू असून, त्याच्या देखभाल व दुरुस्तीची व्यवस्था करणे गरजेचे आहे. ही विकासकामे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी बारामतीकरांची आहे. शहरात विविध ठिकाणी गाळे उभारण्यात आले असून, त्यापैकी काही दिव्यांगांना देण्याचा विचार आहे. यातून त्यांना व्यवसाय उभारता येईल.

# श्री संत तुकाराम कारखान्यात सर्वपक्षीय पॅनलचा दणदणीत विजय

**हिंजवडी । प्रतिनिधी**

कासरसाईतील श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब नवले यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळविला.

नवले यांच्या हिंजवडी ताथवडे गटातूनच कासरसाईचे माजी सरपंच बाळासाहेब भिंताडे यांनी माघार न घेतल्याने एका जागेसाठी निवडणूक लागली होती. यामध्ये भिंताडे यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले.त्यांचा सामना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सर्वपक्षीय शेतकरी विकास पॅनलचे नेते विदुरा नवले यांच्यासह दत्तात्रय गोपाळ जाधव व चेतन हुशार भुजबळ यांच्याशी झाला . यामध्ये नानासाहेब नवले यांना (८५२४) मते, दत्तात्रय जाधव (८३८०) मते, चेतन भुजबळ यांना (७१८९) मते मिळाली. तर अपक्ष उमेदवार बाळासाहेब भिंताडे यांना केवळ २५०५ मते मिळाली.



२०२५ ते २०३० कालावधीसाठी झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी शनिवारी ( दि. ५) पाचही तालुक्यातील ५७ मतदान केंद्रावर एकूण मतदान ९५१५ मतदारांनी मतदान केले होते. त्यापैकी ११२ मते बाद झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी मुकूंद पवार यांनी घोषित केले. प्रत्येक उमेदवाराला पडलेली अंतिम मते व निकाल त्यांनी घोषित केला.

तत्पूर्वी रविवारी ( दि. ६ ) सकाळी ९ वाजल्यापासून वाकड येथील द्रौपदा मंगल कार्यालयात मतमोजणीला सुरुवात करण्यात आली होती. सुरवातीला मुळशी तालुक्यातील मतपेट्या मोजण्यात आल्या. मुळशीच्या पहिल्या फेरीतच भिंताडे पिछाडीवर पडल्याने त्यांना पडद्याआड साथ देणाऱ्या अनेक नेतेमंडळींनी काढता पाय घेतला. नवले यांच्या पॅनेलने घेतलेली आघाडी मावळ तालुक्यातही कायम राहिली. तर खेड हवेली शिरूर तालुक्यातील मरकळ गटात सर्वपक्षीय पॅनलला संचालक अनिल लोखंडे यांनी भरीव आघाडी मिळवून दिली. अखेर तिसऱ्या राऊंड नंतर विजयी व प्रत्येक गटातून बिनविरोध निवडून आलेल्या संचालकांच्या नावांची यादी निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी जाहीर केली.

यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून सर्जेराव कांदळकर ,सचिन सरसमकर, बाळकृष्ण घुगे, उमेश थिटे, संगीता चौधरी, मंदार कुलकर्णी, सुनंदा शिंदे सचिन भिडे व कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक साहेबराव पठारे यांनी काम पाहिले.